**ज्योतिषविषयक**

सुप्रसिद्ध राज ज्योतिष श्री अंबाजी उपासक प. बाबुभाई शास्त्री जन्मतारीख पाहुन हस्तरेषा, नोकरी, व्यापार, विवाह, संतान, गृहक्लेश, प्रेमवंश, कोर्ट, विजय, वास्तुशास्त्र, शास्त्र, धनलाभ, दारू व्यसन, मनोकामना पुर्ण होण्याची 101% गॅरंटी

**तपस्वी हॉटेल बेसमेंट, 9 इंदिरानगर जॉगिंग ट्रॅकजवळ, मुंबई - आग्रारोड, नाशिक संपर्क : ९८२२८१७९०४**



दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com

www.katusatyanews.com



DIRECT ADMISSION

MBBS | MD | MS | BDS | MDS

BAMS | BUMS | BHMS

PANCHAKARMA

DERMATOLOGY | NURSING

PHARMACY

PHYSIOTHERAPY

PARAMEDICAL | VETERINARY

OPHTHALMOLOGY | FMGE

Indo Abroad Education

9326134770



सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक १६४ वा | शुक्रवार, दि. ३० जानेवारी २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR


# सत्तेचा पिसाटलेला खेळ?, देवालाच माहिती!
# किती कर्तबगार नेत्यांचा बळी घेणार? दैव जाणिले कुणी?


**किशोर आपटे,** मुंबई
**मो.+91 98693 97255**


बारामतीच्या हवाईपट्टीचा विकास योग्य पध्दतीने झाला नसल्याचा अंदाज व्यक्त करण्यापासून धुक्यामुळे धावपट्टी दिसली नाही असे संशयाचे धुके आता तज्ज्ञ व्यक्त करताना दिसत आहेत. ज्या अजीत पवार यांचे या भागातील विकासकामांवर डोळ्यात तेल घालून लक्ष होते त्यांनाच मरणोत्तर यासाठी जबाबदार धरण्याचा हा खुनशीपणाचा विचार देखील असू शकतो?. मात्र अजित पवार ही व्यक्ती ज्यांच्या डोळ्यात आणि डोक्यात कायम सलत आली त्यांच्यासाठी त्यांचे अपघाती निधन ही आसुरी आनंदाची पर्वणी असल्याचे समूह माध्यमातून पाहिले तेंव्हा ही माणसे आहेत की जनावरे असा प्रश्न उभा राहिला. सत्तेचा पिसाटलेला खेळ अश्या किती कर्तबगार नेत्यांचा बळी घेणार आहे? ते मात्र सध्या कुणालाच माहिती नाही दैव जाणिले कुणी? सत्तेच्या भुकेल्यांच्या राजकारणात 'असंगाशी संगा'ची नको ती किंमत चुकविलेला रांगडा गडी : अजीत अनंतराव पवार! अजीत दादा!

**नको ती किंमत चुकविलेला रांगडा गडी :**

महाराष्ट्रात मोठी राजकीय उलाथापालथ होण्याची भाकीतं मागील महिनाभरापासून केली जात आहेत, सुनील तटकरे दादांऐवजी उपमुख्यमंत्री होवू शकतात असे राजकीय वर्तुळात कुजबूज देखील सुरू झाली होती. पण तीन दशके राजकीय पत्रकारिता करताना जर तरच्या शक्यतांवर बोलताना किमान लॉजीक असावे असे मनात आले, आणि मग अजित पवार काय करणार? असा उलट प्रश्न त्या चर्चा करणाऱ्यांना विचारला तर तो पत्रकार(?) निरुत्तर झाला. त्यानंतर आता २८ जानेवारीचा भेसूर दिवस पाहिला आणि हादरलोच! महापालिका निवडणुका आणि त्यानंतर च्या घटनाच्या मागचा नियतीचा चेहरा इतका भेसूर राक्षसी नरभक्षक असेल याची कुणी कल्पनाही केली नसेल.! महाराष्ट्राने बेभरवश्याच्या राजकीय खेळात आपला हुकूमाचा शिस्तप्रिय धडाडीचा प्रचंड अनुभवी आणि लोकांच्या हितासाठी भल्या सकाळपासून धडपडणारा अवघा ६६ वर्षाचा ऊमदा नेता गमावला आहे! हे पाहिल्यानंतर राजकीय पटलावरून पवार आणि ठाकरे ही नावे कुणालातरी पूसून टाकायची आहेत या संजय राऊत यांच्या उद्गारांना बळ मिळते!

**यू टर्न घेत नेहमी वादात सापडणारे राजकीय नेते**

आपल्या राजकीय निर्णयांची यू टर्न घेत नेहमी वादात सापडणारे राजकीय नेते अजित पवार यांच्या विमानाने बारामतीच्या विमानतळावर दोनदा यू टर्न घेतला पण दाट धुक्यामुळे धावपट्टीचा अंदाज न आल्याने विमान उतरताना खड्ड्यात गेल्याने अपघातग्रस्त होवून त्यात अजीत पवार यांचा अकाली अंत झाला! असे सांगण्यात येत असले तरी हे जे काही झाले त्या घटनेबाबत संशयाचे ढग देखील दाटून आले आहेत. स्वतः शरद पवार यांनी बारामतीला घटनास्थळी जावून माहिती घेतली तेंव्हा धावपट्टीच्या





बाजुला मोठ्या खड्यात विमान जावून पेटले असे सांगितल्यावर त्यांनी 'खड्यात' असे म्हणत आश्चर्य व्यक्त केल्याचे व्हिडीओ प्रसारित झाले आहेत. भल्या सकाळी उठून दररोज कुठल्या न कुठल्या विकासकामांना भेट देवून त्यांच्या दर्जा आणि उपयुक्ततेबाबत डोळ्यात तेल घालून लक्ष देणारे अजित दादांसारखे नेते देखील या बारामतीच्या हवाईपट्टीच्या भरावाच्या बाजुला असलेल्या खड्ड्याकडे लक्ष देवू शकले नाहीत.? आणि अखेर त्याच खड्याने त्यांचा घात केला असा काहीसा मरणोत्तर अजीत पवारांनाच दोष देण्याचा प्रयत्न देखील त्यांच्या विरोधकांना त्यातून करायचा नाहीना अशी शंका त्यामुळे निर्माण झाली.

देशात अजितदादांसारख्याच स्पष्टवादी नेत्या ममता बॅनर्जी यांनी तर रस्त्यावर येवून दादांच्या निधनामागे राजकीय कारस्थान असल्याचा संशय व्यक्त केला आहे. तर मल्लिकार्जून खर्गे, अखिलेश यादव यांच्याकडूनही विरोधातील नेत्यांच्या सुरक्षेच्या प्रश्नावर चिंता व्यक्त करण्यात आली. पण दादांचे सख्खे काका आणि देशाच्या राजकारणाचे धुरंधर नेते शरद पवार यांनी मात्र अशी शंका घेवून राजकारण करू नका असे म्हणत या अपघाताची कारणे चौकशी अंती समोर येईपर्यंत काही बोलणे योग्य नसल्याचे म्हटले आहे. तरी देखील सगळीकडे हा घातपातच असल्याचा ठाम समज होण्यामागेच सारे काही सत्य दडले आहे नाही का? सारेच अविश्वसनीय! अनपेक्षीत!!

अजीत दादा चर्चेत तसे अनेक वर्ष राहिले मात्र २०१९ला नोव्हे. महिन्यात भल्या सकाळी महाविकास आघाडीचे सरकार येता येता अचानक त्यांना बाजुला टाकून 'यू टर्न' घेत अजीत पवार यांनी साऱ्या देशाला धक्का दिला. राजभवनावर भाजपसोबत भल्या सकाळीच कोश्यारीसमोर शपथविधी पार पाडणारे अजीत पवार यांनी त्यानंतर केवळ ८० तासांत 'यू टर्न' घेत भाजपला तोंडघशी पाडलं होतं. त्यानंतर पुन्हा ते केवळ आठवडाभरात चक्क उध्दव ठाकरेंच्या महाविकास आघाडी सरकारचे उपमुख्यमंत्री झाले होते. त्यानंतर कोरोनाच्या काळात महाराष्ट्राने त्यांची उत्तम प्रशासकाची गुणवैशिष्ट्ये अनुभवली. फारसे शिक्षण नसताना वित्त आणि नियोजनमंत्री म्हणून महाराष्ट्राचे सर्वाधिक अकरा अर्थसंकल्प तयार करणारा हा नेता कपटकारस्थानाच्या राजकारणांचा बळी ठरल्याची खंत आता राजकीय वतुर्ळात व्यक्त केली जात आहे.

**खराखुरा निर्मळ मनाचा रांगडा राजकीय नेता**

खराखुरा निर्मळ मनाचा रांगडा राजकीय नेता असणाऱ्या दादांना आजही शासकीय सनदी अधिकारी टरकून असायचे. मात्र हेच सनदी अधिकारी सध्या मंत्रालयात अन्य मंत्र्याच्या (अगदी भाजपच्याही) अस्तित्वाची देखील दखल घेत नसल्याचे किस्से आपण अलिकडे रोजच ऐकू लागलो आहोत. मात्र 'असंगाशी राजकीय संग' करण्याचा फटका दादांना बसल्याचे अलिकडेच महापलिका निवडणूकीचा निकाल आल्यानंतर राजकीय विश्लेषक म्हणू लागले होते. तर हे स्वतः दादांनीही मान्य करताना जाहीर भाषणातून 'बाबानो हे राजकारण लय वंगाळ आहे याच्या नादी लागू नका आपला उद्योग व्यवसाय करा आणि सुखाने रहा' असे सांगण्यास सुरुवात केली होती! त्यामुळेच त्यांनी त्यांच्या चूका सुधारण्यास सुरुवात करताना मित्रपक्षाला पुन्हा तोंडघशी पाडण्याची तयारी केली होती का? दोन्ही राष्ट्रवादी पक्षांना एकत्र करुन लढायची तयारी करत नव्याने 'यू टर्न' सुरू केला होता का! तोच तर त्यांच्या जिव्हारी आला नाही ना? अश्या चर्चा जनसामान्यात सुरू झाल्या आहेत.

फोन गेले. सायंकाळी सहा पर्यंत संबंधित महिला मंत्रालयात असतानाच त्यांचे वीज कनेक्शन पूर्ववत सुरू झाले होते.

पण बाया तिथच बसून होत्या सायंकाळी सातच्या सुमारास दादांचा काफिला मंत्रालयात आला तर त्या बाया पुन्हा समोर आल्या. मग दादांचा संयम सुटला ते जवळपास चिडलेच. काय झालं? अजून काम झालं नाही का? त्यांनी विचारणा केली. एक म्हातारी पुढे येत त्यांच्या चेहऱ्यावर हात फिरवून म्हणाली 'तुला आशिर्वाद दिल्या बिगर घराकड कस जायाचा? म्हणून वाट बघत राहिलो.' दादा असा जनसामान्यांचा कैवारी नेता होता.

**त्यांना 'पटेल' त्यावेळी ते स्वतः लाथ मारून बाहेर काढतील!**

महाविकास आघाडीमुळे ज्यांचा मनोभंग आणि सत्तेचा स्वप्नभंग झाला त्यांच्याकडून मग अजित पवार यांच्या या रांगड्या राजकारणाचा वेध घेण्यासाठी त्यांना काकांपासून दूर करून मुख्यमंत्री करण्याच्या 'अमिशाचा खेळ' सुरू झाला असे जाणकार सागंतात. त्यांच्या विरोधकांनी त्यांच्या आजुबाजूच्या काही नेत्यांचा त्यासाठी नेहमी आधार घेतल्याचे सांगण्यात येते. कारण दादांना हे सांगायचे कसे? याचा मोठा पेच असल्याचे हे नेते सांगत! मात्र दादांना त्यांच्या निकटवतुर्ळात असलेल्यांनी काहीही सांगितले तरी ते 'मुंडे' हलवतात असा अनुभव काही नेत्यांना आला होता. त्यानंतर जून २०२२मध्ये शिंदेचा सुरत व्हाया गुवाहाटी खेळ झाला आणि ते मुख्यमंत्री झाले. हीच संधी आपल्यालाही होती ती आपण गमावली असे मग दादांनी काही वेळा विरोधीपक्षात असताना सांगितले. पण नंतर त्यांनाही ते 'पटेल' असे प्रयत्न करण्यात आले म्हणे? मग जुलै २०२३मध्ये भाजपसोबत जात एकनाथ शिंदेप्रमाणेच पक्ष आणि चिन्ह देखील पळवायचे हे दादांच्या गळी फारसे उतरले नाही, त्यावेळी त्यांनी नाईलाजानेच हे सारे मान्य केले तरी त्यांच्या शरद पवार यांच्याबद्दलच्या भावना वेगळ्याच राहिल्या. त्यातून मग काकांचा फोटोही वापरण्याचा आणि त्यांना दैवत म्हणायचा प्रयत्न त्यांनी केला.

मात्र त्यांना त्यांच्या कच्छपी लागलेल्या काही नेत्यांबद्दल त्यांना सावध करणारे कुणी काही सांगितले तर कधीच विश्वास बसणे शक्य नव्हते. त्यांच्यासोबतचे काही लोक चुकीच्या दिशेने घेवून जातात हे त्यांना 'पटेल' त्यावेळी दादा असे आहेत की ते स्वतः लाथ मारून त्यांना बाहेर काढतील किंवा स्वतः तेथून बाहेर पडतील असे त्यांच्या निकटच्या एका नेत्याने त्यावेळी खाजगीत सांगितले होते. कदाचित त्या प्रक्रियेची सुरुवात महापालिका निवडणूकांच्या पराभवाच्या निमित्ताने दोन्ही पक्षांच्या विलीनीकरणाच्या चर्चा करण्यापर्यंत जात अजित दादांकडून झाली होती. हीच गोष्ट तर नियतीला मान्य नसावी की तिने त्यांना कायमचे दूर नेले!? अशी चर्चा लगोलग सगळीकडे सुरू झाली आहे.

त्यांच्या अकाली निधनानंतर आता त्यांच्या पक्षाच्या समर्थक चाळीस(४०) आमदारांचे मंत्र्याचे नेतृत्व कुणाकडे जाणार? हा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळेच दादा गेल्यानंतर आता आगामी अर्थसंकल्प कोण मांडणार? या प्रश्नापासून त्यांच्या पक्षाच्या विधिमंडळातील गटाचे नेते कोण होणार? या प्रश्नापर्यंत अनेक प्रश्नाची भली मोठी गर्दी तयार झाली आहे. त्यामुळे महाराष्ट्राच्या राजकारणात उपमुख्यमंत्री बदलण्याची भाकीते करणाऱ्यांच्या बातम्या कदाचित खऱ्या होतीलही मात्र तरी आता आणखी किती अक्राळविक्राळ रूप या बातम्या घेणार आहेत? देवालाच माहिती! पण हा सत्तेचा पिसाटलेला खेळ अश्या किती कर्तबगार नेत्यांचा बळी घेणार आहे ते मात्र सध्या कुणालाच माहिती नाही दैव जाणिले कुणी?

# अपक्ष असलो तरी शेतकऱ्यांचा विश्वासच माझी खरी ताकद

## नरखेड जि.प. गटातून लक्ष्मण मगर रिंगणात

**नरखेड (कटूसत्य वृत्त):-** काँग्रेस पक्षाकडून अधिकृत उमेदवारी मिळाली नसली तरी काँग्रेसच्या विचारधारेतून आणि महाविकास आघाडीचा उमेदवार म्हणूनच आपण निवडणूक लढवत असल्याचे स्पष्ट करत अपक्ष उमेदवार लक्ष्मण भुजंग मगर यांनी शेतकऱ्यांच्या विश्वासालाच आपली खरी ताकद असल्याचे सांगितले. शेतकऱ्यांनी माझ्यावर दाखवलेल्या विश्वासाला तडा जाऊ देणार नाही, असा ठाम निर्धार त्यांनी व्यक्त केला.

मगर म्हणाले की, 'आजवर मी शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी सातत्याने प्रयत्न केले आहेत. अतिवृष्टी असो वा पिक विम्याचा



प्रश्न, शासनाच्या विविध योजना शेतकऱ्यांपर्यंत घरोघरी पोहोचाव्यात यासाठी प्रयत्न केले. अनेक वेळा शेतकऱ्यांचा हक्क मिळवून देण्यासाठी प्रशासनाशी पाठपुरावा केला. मी केलेल्या कामाची देणगीच शेतकरी आता मतपेटीतून देणार आहेत, याचा मला पूर्ण विश्वास आहे.'


नरखेड जिल्हा परिषद गटातून निवडणूक लढवताना आपण अपक्ष असलो तरी पक्षाची ताकद आणि जनतेचा पाठिंबा पाठीशी असल्याचे त्यांनी नमूद केले. 'एकीकडे भाजप आणि धनुष्यबाणासारखी बलाढ्य यंत्रणा असताना देखील जनतेने अपक्ष उमेदवार म्हणून मला स्वीकारले आहे, ही माझ्यासाठी मोठी जबाबदारी आहे,' असेही मगर यांनी सांगितले.

शेतकरी, कष्टकरी, सामान्य नागरिक यांच्या प्रश्नांना प्राधान्य देत विकासकामांचा पाठपुरावा केला असून, याच कामांच्या बळावर ही निवडणूक लढवत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. महाविकास आघाडीच्या विचारांशी निष्ठा ठेवत, जनतेच्या अपेक्षांवर खरे उतरू, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

दरम्यान, नरखेड जि.प. गटातील निवडणूक रंगतदार होत चालली असून, अपक्ष उमेदवार लक्ष्मण मगर यांना मिळणारा शेतकऱ्यांचा पाठिंबा निवडणुकीत निर्णायक ठरणार असून सोलापूरच्या खासदार प्रणिती ताई शिंदे यांची ही जाहीर सभा होणार असून त्या जाहीर सभेकडे सर्व मतदारसंघातील शेतकऱ्यांचे व मतदारांचे, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# अजित पवार अनंतात विलीन..!

## लाडक्या नेत्याला निरोप देताना फुटला अश्रूंचा बांध







**बारामती (कटूसत्य वृत्त):-** राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे बुधवारी (दि. २८) सकाळी पावणेनऊच्या सुमारास अपघाती निधन झाले. गुरूवारी दुपारी १२ वाजून ८ मिनिटांनी बारामती येथील विद्या प्रतिष्ठानच्या मैदानावर त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

पार्थ आणि जय पवार यांनी अजित पवारांच्या पार्थिवाला मुखाग्नी दिला. यावेळी जमलेल्या लाखो कार्यकर्ते आणि बारामतीकरांनी अश्रू ढाळत लाडक्या नेत्याला अखेरचा निरोप दिला.

(पान 2 वर..)


VNP MOTORS

Multi Brand Car Sales & Services

सोलापूर मध्ये पहिले मल्टिब्रँड कार चे सुसज्ज शोरूम व वर्कशॉप

OFFER

पेट्रोल कार SYNTHETIC OIL सर्व्हिस करा फक्त ₹2949/-

डिजेल कार SYNTHETIC OIL सर्व्हिस करा फक्त ₹3649/-

AC OVERHAUL HATCHBACK RS. 2500/- SEDAN - 3000/- SUV - 3500/-

FREE PICK-UP & DROP

CNG RTO मान्यता प्राप्त CNG Retro Fitment Center

8000-92-8007

VNP MOTORS Pvt. Ltd.

GAT No. 17/2, Hyderabad Road, Next to Ford Showroom, Solapur - 9591958007


# जिल्हा परिषद व पंचायत समित्यांसाठी 7 फेब्रुवारी रोजी मतदान 9 फेब्रुवारी रोजी मतमोजणी

**मुंबई, (कटूसत्य वृत्त):-** उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनामुळे राज्यात तीन दिवसांचा दुखवटा जाहीर करण्यात आला असल्यामुळे 12 जिल्हा परिषदा व त्यांतर्गतच्या 125 पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकांच्या उर्वरित टप्प्यांमध्ये बदल करण्यात आला असून 5 फेब्रुवारी 2026 ऐवजी आता 7 फेब्रुवारी 2026 रोजी मतदान; तर 7 फेब्रुवारी 2026 ऐवजी 9 फेब्रुवारी 2026 रोजी मतमोजणी होईल.

राज्य निवडणूक आयोगाने या जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांच्या निवडणुकांसाठी 13 जानेवारी 2026 रोजी निवडणूक कार्यक्रम जाहीर केला होता. त्यानुसार नामनिर्देशनपत्र दाखल करणे, नामनिर्देशनपत्र मागे घेणे, चिन्ह वाटप आणि निवडणूक लढविणाऱ्या अंतिम उमेदवारांची यादी प्रसिद्ध करणे




इत्यादी टप्प्यांच्यी प्रक्रिया पूर्ण झाली आहे. त्यापुढील मतदान, मतमोजणी आणि निवडून आलेल्या सदस्यांची नावे राजपत्रात प्रसिद्ध करणे हे टप्पे शिल्लक आहेत.

मा. सर्वोच्च न्यायालयाने या निवडणुकांसाठी 31 जानेवारी 2026 च्या पुढे फक्त दोन आठवड्यांची मुदत वाढ दिली आहे; परंतु उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे 28 जानेवारी 2026 रोजी अपघाती निधन झाल्यामुळे राज्य शासनाने राज्यात 28 जानेवारी 2026 ते 30 जानेवारी 2026 पर्यंत दुखवटा जाहीर केला आहे. या कालावधीचा विचार करून जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांच्या निवडणुकांच्या कार्यक्रमातील उर्वरित टप्प्यांमध्ये बदल करण्यात आले आहेत. त्यानुसार संबंधित जिल्हाधिकारी सुधारित निवडणूक कार्यक्रमाची सूचना 31 जानेवारी 2026 रोजी प्रसिद्ध करतील. आता 7 फेब्रुवारी 2026 रोजी सकाळी 7.30 ते सायंकाळी 5.30 या वेळेत मतदान होईल. त्यामुळे जाहीर प्रचाराची समाप्ती 5 फेब्रुवारी 2026 रोजी रात्री 10 वाजता होईल. संबंधित ठिकाणी 9 फेब्रुवारी 2026 रोजी सकाळी 10 वाजता मतमोजणी सुरु होईल. निकाल जाहीर झाल्यानंतर संबंधित ठिकाणची आचारसंहिता संपुष्टात येईल. निवडून आलेल्या सदस्यांची नावे शासन राजपत्रात 11 फेब्रुवारी 2026 पर्यंत प्रसिद्ध केली जातील.

# भागाच्या आणि जनतेच्या विकासासाठीच निवडणुकीच्या रिंगणात - अक्षय खताळ

**कुरुल (कटूसत्य वृत्त):-** केंद्रामध्ये नरेंद्र मोदी यांचे तर राज्यामध्ये देवेंद्र फडणवीस यांचे नेतृत्व असल्याने महाराष्ट्राचा भरीव आणि भक्कम विकास झाला आहे. ग्रामीण भागातील तळागाळातील लोकांपर्यंत भारतीय जनता पार्टीने आणि सरकारने थेट योजना पाठविल्या आहेत. येणाऱ्या काळात देखील विकासाचं मोठं व्हिजन सरकारच्या समोर असून कामठी गटाच्या प्रत्येक गावातील जनतेच्या विकासासाठीच निवडणुकीच्या रिंगणात मातोश्री विमलताई खताळ यांच्या माध्यमातून उभा असल्याचे प्रतिपादन युवा नेते अक्षय खताळ यांनी केले.

कामती जि. प. गटातील कामती गणात प्रचाराचा झंजावात करत असताना ते बोलत होते.

## कामती भागात प्रचाराचा झंझावात



पुढे बोलताना ते म्हणाले की, स्व. तानाजीराजे खताळ यांनी जिथे शक्य असेल तिथे शासकीय योजनांच्या माध्यमातून आणि शक्य नसेल तिथं स्वखर्चातून कामती भागातील गावांसाठी आणि गावातील लोकांसाठी मदत पोहोचवण्याचं काम केलं आहे. त्यामुळे तालुक्याचे भाग्यविधाते माजी आमदार तथा सहकार परिषदेचे अध्यक्ष राजन पाटील यांनी मोठ्या विश्वासाने उमेदवारी दिली आहे. कार्यकर्त्यांचे बळ आणि प्रेम पाहता लोकनेते चेअरमन बाळराजे पाटील, सिनेट सदस्य अजिंक्य राणा पाटील, विकासप्रिय माजी आमदार यशवंत माने यांनी कामती भागाचा केलेला विकास यामुळे जनता कमळ चिन्हाला नक्कीच स्वीकारेल. आता जबाबदारी प्रत्येक कार्यकर्त्याच्या खांद्यावर असून झपाटून कामाला लागण्याचे आवाहन त्यांनी केले.

यावेळी अभिजीत राठोड, दिलीप राठोड, हब्बु राठोड, नातू राठोड, सुभाष राठोड, संदीप राठोड, बाबू राठोड, शरद पवार, मयूर पवार, अमर राठोड, सुरेश राठोड, सावंत राठोड, सदाशिव राठोड, मनोज पवार, प्रभाकर पवार, अंतोष राठोड, राजू पवार, राजू राठोड, अमोल राठोड, हणमंत राठोड, दत्ता राठोड, मोतीलाल राठोड, अर्जुन राठोड, अविनाश राठोड, प्रशांत पवार, रवि पवार, प्रकाश पवार आदी उपस्थित होते.

## संपादकीय

# चौकशीची संधीच का हिरावली गेली?

लोकशाही व्यवस्थेत चौकशी ही शिक्षा नसते; ती सत्यापर्यंत पोहोचण्याची प्रक्रिया असते. म्हणूनच 'चौकशी होऊ द्यायला हवी होती' असे म्हणणे हा कोणाचाही बचाव नसून न्यायप्रक्रियेवरील विश्वासाचा मुद्दा आहे. मात्र आजचा खरा प्रश्न वेगळाच आहे, ही चौकशी झाली असती, तर ती निष्पक्ष आणि विश्वासार्ह झाली असती का?

कारण चौकशी करणाऱ्या यंत्रणाही माणसांनीच चालवल्या जातात; त्या देवदूत नसतात. त्यांच्यावर राजकीय दबाव नसतो, स्वार्थ नसतो, पूर्वग्रह नसतो. याची हमी कोण देऊ शकते? चौकशीच्या नावाखाली निकाल आधीच ठरलेले असतील, अशी भीती सामान्य नागरिकाला वाटत असेल, तर ती लोकशाहीसाठी धोक्याची घंटा नाही काय?

अजित दादांच्या बाबतीत घडलेले पाहता, हा केवळ एका व्यक्तीचा अंत नाही; तर सत्तेला अस्वस्थ करणाऱ्या, ठाम भूमिका घेणाऱ्या आणि प्रश्न विचारण्याचे धाडस ठेवणाऱ्या नेतृत्वाचा अंत असल्याची भावना अधिक तीव्र होते. त्यांनी उपस्थित केलेले प्रश्न, त्यांनी धोक्यात आणलेले हितसंबंध पाहता, 'त्यांना संपवायचे होते म्हणूनच त्यांना संपवले गेले' असा संशय निर्माण होणे स्वाभाविक ठरते.

येथे 'कोण संपवते?' हा प्रश्न जितका महत्त्वाचा आहे, तितकाच 'कोणाच्या फायद्यासाठी?' हा प्रश्नही गंभीर आहे. कारण जेव्हा एखादा नेता चौकशीला सामोरा जाण्याआधीच गप्प केला जातो, तेव्हा चौकशी थांबते; पण प्रश्न मात्र अधिक तीव्र आणि अस्वस्थ करणारे होतात.

आज व्यवस्थेने आत्मपरीक्षण करण्याची वेळ आली आहे. चौकशी यंत्रणांवरील जनतेचा विश्वास का ढासळतो आहे? या यंत्रणा खरोखरच स्वतंत्र आहेत की सत्ताधाऱ्यांच्या सोयीची साधने बनत चालल्या आहेत? जर चौकशी करणाऱ्यांवरच लोकांचा विश्वास उरलेला नसेल, तर लोकशाहीचा पाया हादरत असल्याचे स्पष्ट संकेत मानावे लागतील.

अजित दादांच्या जाण्याने केवळ एक नेता गेला नाही; सत्य बाहेर येण्याची शक्यताही मोठ्या प्रमाणावर संपली आहे. आणि हेच सर्वात धोकादायक आहे. कारण जेव्हा प्रश्न विचारणारेच नाहीसे होतात, तेव्हा समाज भीतीवर आणि मौनावर चालू लागतो.

जात-पात, धर्म, आकडेमोड यापलीकडे जाऊन मुद्द्यांवर बोलणारा, कामावर निवडणूक लढवणारा नेता आज दुर्मीळ झाला आहे. अजित दादांनी ते शक्य आहे, हे आपल्या कृतीतून दाखवून दिले होते. आज महाराष्ट्राच्या राजकारणात आरडाओरडा आहे, गोंधळ आहे; मात्र दृष्टी, स्पष्टता आणि मुद्देसूदपणा कमी पडतो आहे. त्यामुळेच त्यांच्या अनुपस्थितीची जाणीव अधिक तीव्रतेने होते.

असा सच्चा, तडजोड न करणारा आणि सर्वसामान्यांच्या प्रश्नांशी नातं जपणारा नेता जाणे हे या भूमीसाठी मोठे दुर्दैव आहे. मात्र त्यांनी उभा केलेला विचार, राजकीय शालीनता आणि मुद्द्यांवर आधारित राजकारण हेच त्यांच्या स्मृतींचे खरे स्मारक ठरेल.

लोकशाही ही केवळ निवडणुकांपुरती मर्यादित नसते; ती विश्वासावर उभी असते. तो विश्वास जर चौकशी यंत्रणांवरून उडाला असेल, तर तो परत मिळवणे ही व्यवस्थेची जबाबदारी आहे. अन्यथा इतिहास पुन्हा पुन्हा तोच प्रश्न विचारत राहील चौकशीची संधीच का हिरावली गेली?

# नोट घेऊन वोट देणे कधी बंद करणार ?

निवडणुकीच्या काळात कोणताही राजकीय उमेदवार निवडणूक रिंगणात उतरायचे झाल्यास, सोबत भरपूर पैशाचे भांडवल घेऊनच निवडणूक रिंगणात पाय ठेवत असतो. कोणतीही निवडणूक असो, पैशाशिवाय लढवली जात नाही. ग्रामपंचायत असो, पंचायत समिती असो, जिल्हा परिषद असो, विधानसभा असो अथवा लोकसभा असो प्रत्येक निवडणुकीत उमेदवार पैशाचा धुरळा करतच असतात. निवडणूक जवळ येऊ लागली की, प्रचाराच्या तोफा बुलंद होतात, एकमेकांवर आरोप प्रत्यारोपाच्या फैरी झाडल्या जातात. प्रत्येक उमेदवार आपल्या मतदारसंघात प्रचार सभा घेत असतो, आणि आपल्या भाषणातून पोकळ आश्वासनांचा भडीमार करत असतो. आतापर्यंत आम्ही काय केले आणि काय नाही केले? याचा लेखाजोखा मांडत असतात आणि भविष्यात काय करणार आहोत याचा वचननामा देत असतात. प्रत्येक उमेदवार आपल्या मतदार संघात पैशाचा पाऊस पाडत असतो. दारू, मटन व पार्ट्यांचा चारत असतो. एकापेक्षा एक वरचढ पैसे वाटणारे उमेदवार निवडणूक काळात पैसे वाटताना आपण पाहिले असतील. एखाद्या उमेदवाराने मताला पाचशे रुपये दिले तर दुसरा उमेदवार मताला एक हजार रुपये देण्याची तयारी ठेवतो. म्हणजे निवडणूक लढवण्यासाठी प्रत्येक उमेदवारांमध्ये एकापेक्षा एक वरचढ पैसा वाटण्याची जणू स्पर्धाच लागलेली असते. मतदान दोन दिवसांवर येऊन ठेपले की, लगेच आमचे सुजान मतदार बंधू भगिनी कोणता उमेदवार पैसे घेऊन येईल याची रात्रभर वाट पाहत असतात. त्यासाठी आदल्या रात्री समाज बांधव रात्रभर जागरण करत असतात. कारण पैसा दिवसा वाटला जात नाही तर संध्याकाळी दिला जातो. आमचे मतदार बंधू भगिनी हजार पाचशे रुपयांसाठी उमेदवारांकडून पैसे घेऊन लाचार होताना मी पाहिले आहेत. राजकारणी लोकांनी पैसे देऊन मतदान विकत घेण्याची जणू परंपराच पाडली आहे. म्हणून मतदार बांधवांना पैसा घेऊन मतदान करण्याची सवय जडली आहे. कोणताच माणूस पैसा घेतल्याशिवाय मतदान करायला तयार नसतो. दारू, मटन, बिर्याणी आणि पैसा घेऊनच मतदार बंधू भगिनी मतदान करायला तयार होतात. जेवढे उमेदवार निवडणूक रिंगणात उतरलेले, तेवढे उमेदवार एकापेक्षा एक वरचढ पैशाचा पाऊस पाडून मतदारांना मतदान करण्याची विनंती करतात. जो उमेदवार सगळ्या उमेदवारांपेक्षा अधिक पैसा देतो, त्या उमेदवाराला मतदान करण्याचा जनतेचा कौल दिसतो. निवडणूक काळात कार्यकर्त्यांची जणू सुगीच असते. जो उमेदवार पैसे देऊन मतदान विकत घेतो तो उमेदवार निवडून आल्यावर विकास कामे करेल याची शाश्वती कोणीच देऊ शकत नाही. निवडून आलेला उमेदवार पाच वर्षे आपण जनतेला दिलेला पैसा आपल्या पदाच्या माध्यमातून कसा काढता येईल? ते पाहत असतो. जनता सुद्धा पैसे घेऊन व दारू मटन आणि पार्ट्या खाऊन लाचार झालेली असते. जनतेला विजयी उमेदवाराला सामाजिक विकास कामे करा म्हणून बोलण्यासाठी जराही तोंड नसते. निवडून आलेला पुढारी आपण दिलेल्या आश्वासनाची पूर्ती करण्यात असफल ठरतो. कारण त्या उमेदवाराची सुद्धा काही चुकी नसते. त्याने निवडणूक लढवण्यासाठी मतदारसंघात भरपूर पैसा उधळलेला असतो. म्हणून तो निवडून आल्यावर विकास कामे न करता आपला गेलेला पैसा परत कसा मिळवता येईल? हे बघत असतो. मित्रांनो आपण पैसा घेऊन मतदान करत असताना तर आपला स्वाभिमान विकत आहात, असे समजा. ज्या माणसाला स्वाभिमान काय असतो? हे माहीत नाही तोच माणूस निवडणुकीत पैसे घेऊन मतदान करतो. हल्ली पैसे न घेता मतदान करणारे लोक मतदारसंघात फार कमी झाले आहेत. आणि पैसे घेऊन मतदान करणाऱ्या लोकांचा सुळसुळाट वाढला आहे. गोरगरीब, कष्टकरी, कामगार, वंचित आणि उपेक्षित माणसेच निवडणुकीत पैसे घेतात असे नाही, तर श्रीमंत नोकरदार आणि भरपूर पैसा व संपत्ती असणारे लोक सुद्धा उमेदवाराकडून पैसे घेताना दिसतात. आजकाल माणसे खूप शिकली, मोठमोठ्या पदावर दिमाखात विराजमान झाली, तरीसुद्धा माणसांना मतदानाची किंमत अजूनही कळाली नाही. एक वेळ गोरगरीब सामान्य जनतेने उमेदवाराकडून पैसे घेतले तर ती गोष्ट तेवढी चिंताजनक नाही. परंतु ज्या माणसाकडे भरपूर पैसा आहे, तो मोठ्या पदावर अधिकारी आहे, तरीसुद्धा तो माणूस उमेदवाराकडून पैसे घेत असेल तर त्या माणसाच्या शिक्षणाला आणि नोकरीला काय चुलीत घालायचे आहे का? महामानव भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय संविधान लिहिताना समस्त मानव जातीचा विचार करून प्रत्येकाला एकाच मताचा अधिकार देऊन या देशाची शासनकर्ती जमात बनवले आहे. माणूस झोपडीत राहणार असो, महालात राहणार असो, रस्त्याच्या कडेला पालात राहणार असो किंवा कोणत्याही जाती धमार्चा असो, प्रत्येकाला एकाच मताचा अधिकार देऊन या देशात समता, बंधुता, मानवता व एकता रुजवण्याचा प्रयत्न केला आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की, मताची किंमत मीठ मिरच्या एवढी समजू नका. ज्या दिवशी तुम्हाला मताची किंमत कळेल त्या दिवशी तुमच्या एवढा कंगाल माणूस कोणीच नसेल. म्हणून म्हणतो, मताची किंमत अनमोल व मौल्यवान आहे. जो उमेदवार निवडणुकीत एका मताने पराभूत होतो, त्या उमेदवाराला मताची किंमत काय असते? ते विचारा. बाबासाहेबांनी आपल्याला मतदानाचा अधिकार देऊन आपल्यावर कधीही न फिटणारे महान असे उपकार करून ठेवले आहेत. हजार पाचशेच्या नोटांवर मतदान विकून बाबासाहेबांच्या विचारांना पायदळी तुडवून बाबासाहेबांच्या विचारांचा घोरा अपमान करत असाल तर तुम्ही बाबासाहेबांच्या विचारांचे खरे पाईक नाहीत, असेच म्हणावे लागेल. पूर्वी राजा राणीच्या पोटातून जन्माला यायचा आणि आता राजा हा मतपेटीतून जन्माला येत आहे, ही देणगी माझ्या डॉ.बाबासाहेबांची आहे. माझ्या सुजाण मतदार बंधू आणि भगिनींना कळकळीचे नम्र आवाहन करतो की, बांधवांनो दीड दमडीवर आपले अनमोल मतदान विकून स्वाभिमान शून्य व लाचारीचे जीवन जगण्यापेक्षा, जो उमेदवार पैसे न वाटणारा परंतु उच्चशिक्षित व राजकीय वलय असणारा आहे, त्याच उमेदवाराला पैसे न घेता निवडून आणावे. पैसे घेण्याऐवजी सामाजिक कार्य करायला लावावे, जसे की, समाज मंदिर, समशानभूमी, गल्लीतील रस्ते व अनेक विविध विकास कामे त्यांना करायला लावून मतदान करावे. बाबासाहेबांनी तुम्हाला मतदान विकण्यासाठी मतदार केले नाही, तर योग्य उमेदवार निवडून सामाजिक विकास कामे करण्यासाठी कटिबद्ध असणारा उमेदवार निवडून देण्याचे बाबासाहेबांचे आवाहन होते. परंतु लोकांना अजूनही बाबासाहेबांनी दिलेल्या मतदानाची किंमत नीट समजली नाही. ज्या दिवशी आपल्याला बाबासाहेबांनी दिलेल्या मताची किंमत कळेल त्या दिवशी आपण आपले मतदान कधीच विकणार नाहीत. उलट पैसे देणाऱ्या उमेदवाराला आपल्या दाराला सुद्धा उभे टाकू देणार नाहीत. ज्या दिवशी देशात पैसे घेऊन मतदान करण्याची पद्धत बंद होईल, त्या दिवशी या देशाचा खरा विकास होईल. जो उमेदवार खरोखरच जनहितासाठी व देशहितासाठी निवडणूक लढवतो तो उमेदवार कधीच पैसा वाटत नाही. तो निवडून आल्यावर जनहिताची कामे केल्याशिवाय स्वस्त बसत नाही. परंतु आपण पैसे न वाटणाऱ्या उमेदवाराला डावलून पैसे देणाऱ्या उमेदवाराला विजयी करतो. आणि मग आपण सरकारला दोष देतो. सरकारला व आपल्या मतदारसंघाच्या प्रतिनिधीला नावे ठेवतो. सरकार जनहितासाठी व समाज हितासाठी निष्क्रिय आहे. गोरगरीब, दीनदलीत व तळागाळातील लोकांचा विकास करण्यासाठी शासन कटिबद्ध नाही, म्हणून आपण प्रशासनाला नावे ठेवतो. एकीकडे पैसे घेऊन मतदान करायचे आणि दुसरीकडे निवडून आलेल्या उमेदवाराला विकास कामे करत नाही म्हणून नावे ठेवायचे. हे असे कसे चालणार? मतदार संघात पैशाचा पाऊस पाडणारा उमेदवार विकास कामे कसे करणार? त्यांना विकास कामे करा म्हणायला आपल्याला तोंड तरी असेल का? जोपर्यंत पैसे घेऊन मतदान करणे ही प्रथा बंद होणार नाही तोपर्यंत समाजाचा, शहराचा व देशाचा विकास होणे शक्य नाही. ज्या दिवशी समाजातील समस्त लोक एकत्र येऊन पैसे वाटणाऱ्या उमेदवाराला धुडकावून लावतील आणि पैसे न वाटणाऱ्या परंतु राजकीय क्षेत्राची पुरेपूर जाण असणाऱ्या सर्वसामान्य कुटुंबातील उमेदवाराला आपण निवडून द्याल, त्या दिवशी आपल्या समाजाचा, शहराचा व देशाचा विकास झाल्यावाचून राहणार नाही. मतदारांनी उमेदवाराला दारू, मटण व पार्ट्या मागणे बंद करावे. समाजातील सर्व लोकांनी एकत्र येऊन मताला पैसे न मागता आमच्या समाजाची विकास कामे करा म्हणून त्यांना ठणकावून सांगितले पाहिजे. तरच निवडून आल्यावर उमेदवार विकास कामे करतील...अन्यथा आपण पैसाही घ्यायचा आणि विकास कामे करा म्हणून सांगायचे, हे असे कसे चालणार हो? जो उमेदवार खूप कमी वयातच सामाजिक चळवळीत व समाजकार्यात स्वतःला झोकून देऊन काम करत आलेला आहे, जो उमेदवार चारित्र्यवान, कर्तृत्ववान, निष्कलंक व निष्कपट आहे व त्याला सामाजिक कार्य करण्याची खूप आवड आणि राजकीय क्षेत्राची पुरेपूर जाण आहे, तोच उमेदवार कोणताच राजकीय वारसा नसताना निवडणुकीला पहिल्यांदाच उभा राहिला असेल तर त्या गरीब, होतकरू व सर्वसामान्य उमेदवाराला आपण प्रचंड मतांनी निवडून देणे व विकासाची गंगा आपल्या समाजात व शेत शिवारात खेचून आणायला लावणे आपले काम आहे. त्यासाठी आपल्याला पैशाकडे न बघता माणसाकडे बघून त्याला निवडून देण्याचा प्रयत्न केला पाहिजे. थोड्याफार पैशाला, दारू व मटणाला आणि त्यांच्या पोकळ आश्वासनांना व त्यांच्या भुलतापांना बळी पडून आपले अमूल्य मत त्यांना विकणे म्हणजे आपण लोकशाहीचा आणि घटनाकाराचा घोर अपमान केल्यासारखा आहे. त्यासाठी समस्त जनतेला माझी कळकळीची नम्र प्रार्थना आहे की, बांधवांनो आपण आपले अमूल्य मत दीडदमडीवर न विकता उच्चशिक्षित व राजकीय क्षेत्राची जाण असणाऱ्या लायक उमेदवाराला मतदान रुपी आशीर्वाद देऊन त्याला सामाजिक कार्य करण्याची संधी द्यावी...ते नक्कीच आपल्या संधीचे सोने करून आपल्या दारापर्यंत आणि शेत शिवारापर्यंत विकासाची गंगा आणल्याशिवाय राहणार नाहीत, त्यासाठी गरज आहे ती, नोट घेऊन वोट देणे ही प्रथा बंद करण्याची...

**- बुद्धभूषण चंद्रकांत कांबळे**
खंडाळी ता.अहमदपूर
जिल्हा लातूर
मो.7498715661

पान १ वरून

## अजित पवार अनंतात...

मुंबईहून बारामतीकडे जिल्हा परिषदेच्या प्रचारासाठी येत असताना बुधवारी विमान अपघातात अजित पवार यांच्यासह पाच जणांचे निधन झाले. यानंतर संपूर्ण राज्यभर शोकाकुल वातावरण पसरले. अजित पवारांचा मृतदेह बारामती येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर वैद्यकीय महाविद्यालयात आणण्यात आला. तेथे त्यांच्या मृतदेहाचे शवविच्छेदन करण्यात आले. त्यानंतर बुधवारी संध्याकाळी ७ वाजून ४० मिनिटांनी अजित पवारांचे पार्थिव विद्या प्रतिष्ठानच्या मैदानावर अंत्यदर्शनासाठी ठेवण्यात आले होते.

गुरुवारी सकाळी अजित पवार यांचे पार्थिव सकाळी आठच्या सुमारास काटेवाडी येथील त्यांच्या मूळ निवासस्थानी ठेवण्यात आले. त्यानंतर त्यांच्या घरातून अंत्ययात्रेला सुरुवात करण्यात आली. बारामती येथील पेन्सिल चौकातून विद्या प्रतिष्ठानच्या मैदानात त्यांना आणण्यात आले. त्यावेळी जमलेल्या लाखोंच्या जनसमुदायांच्या मुखातून, 'अजित दादा अमर रहे'च्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला होता. यावेळी उपस्थित अनेकांना त्यांचे अश्रू अनावर झाले होते. 'दादा परत या... परत या...' अशा घोषणादेखील उपस्थित जनसमुदायांकडून वारंवार देण्यात येत होत्या. यावेळी ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्यासह संपूर्ण पवार कुटुंबीय उपस्थित होते. अजित पवारांचे पार्थिव मैदानात उभारण्यात आलेल्या चौथऱ्यावर ठेवण्यात आले. त्यानंतर वैदिक पद्धतीने मंत्रोच्चार करण्यात आले. त्यानंतर आलेल्या मान्यवरांनी पुष्पचक्र अर्पण केले. यावेळी शासकीय इतमामात बंदुकीच्या फैरी झाडत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

**या मान्यवरांनी वाहिली श्रद्धांजली...**

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भारतीय जनता पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबीन, गोव्याचे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत, केंद्रीय दळणवळण मंत्री नितीन गडकरी, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले, बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले, शंभुराज देसाई, केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव, राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, मेघना बोर्डीकर यांच्यासह खासदार प्रफुल्ल पटेल, धनंजय मुंडे, सुनील तटकरे, हसन मुश्रीफ, छगन भुजबळ, चंद्रकांत पाटील, मुरलीधर मोहोळ, खासदार छत्रपती शाहू महाराज, आंध्र प्रदेशचे शिक्षणमंत्री नारा लोकेश, सी. एम. रमेश, केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे, राज्यमंत्री माधुरी मिसाळ, आदिती तटकरे, विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, गणेश नाईक, सुशीलकुमार शिंदे, जयंत पाटील, रवींद्र चव्हाण, अशोक चव्हाण, पंकजा मुंडे, काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, शशिकांत शिंदे, गिरीश महाजन, नीरज चंद्रशेखर, महादेव जानकर, जयकुमार गोरे, डॉ. अमोल कोल्हे, राधाकृष्ण विखे- पाटील, रितेश देशमुख, नरहरी झिरवळ, राहुल कुल, दत्तात्रय भरणे, राजेश टोपे, धैर्यशील मोहिते-पाटील, मकरंद पाटील, विजय शिवतारे, मंगलप्रभात लोढा, संजय राठोड, राजेंद्र गवई, श्रीकांत शिंदे, डॉ. प्रीतम मुंडे, आकाश फुंडकर, निवेदिता माने, रुपाली चाकणकर, सचिन आहेर, सतीश चव्हाण, पोलिस महासंचालक सदानंद दाते, राज्याचे मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्यासह राज्यभरातील खासदार, आमदार, विविध विभागांचे वरिष्ठ अधिकाऱ्यांची उपस्थिती होती.

**बारामतीकरांनी पाळली शिस्त...**

अजित पवार यांच्या अंत्यसंस्कारावेळी लाखोंचा जनसमुदाय विद्या प्रतिष्ठानच्या मैदानात जमला होता. यावेळी कोणतीही गडबड, गोंधळ न करता शिस्त पाळून त्यांच्या लाडक्या दादांना त्यांनी श्रद्धांजली वाहिली. पहाटे पाच वाजल्यापासून चाहत्यांनी मैदानावर गर्दी केली होती. जसजशी अंत्यसंस्काराची वेळ जवळ येत होती, तसतसा लाखोंच्या संख्येने जनसमुदाय विद्या प्रतिष्ठानच्या प्रांगणात जमा होत होता. प्रत्येकाला अजित पवारांना बघण्याची शेवटची इच्छा होती. मैदान परिसरात व बाहेरच्या बाजूला अजित पवारांचे अंतिम दर्शन सगळ्यांना व्हावे, यासाठी डिजिटल स्क्रीनची व्यवस्था करण्यात आली होती. यावेळी महिलांची उपस्थितीदेखील मोठ्या संख्येने होती.

**११ हजार पोलिसांचा बंदोबस्त...**

अजित पवार यांच्या अपघाती निधनानंतर संपूर्ण राज्यभरात शोककळा पसरली आहे. त्यांच्या निधनाची बातमी समजताच सबंध राज्यभरातून मिळेल त्या वाहनाने लोकांनी बारामतीकडे धाव घेतली. या पार्श्वभूमीवर बारामती शहर व परिसरात अभूतपूर्व पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. पुणे ग्रामीण पोलिसांसह पुणे पिंपरी-चिंचवड, ठाणे, कोल्हापूर, सातारा येथील पोलिसांसह राज्य राखीव पोलीस (एसआरपी) असा ११ हजारांचा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. वाहतूक सुरळीत राहावी, यासाठी स्वतंत्र वाहतुकीचेदेखील नियोजन करण्यात आले होते.


**जनतेच्या मनातील नेता हरपला..**

अजित पवार हे जनतेच्या थेट संपर्कातील, आक्रमक निर्णयक्षमतेसाठी ओळखले जाणारे नेते होते. बारामती आणि राज्याच्या विकासात त्यांचे मोठे योगदान होते. त्यांच्या आकस्मिक निधनाने राज्याच्या राजकारणात मोठी पोकळी निर्माण झाली असून, 'आमचा नेता हरपला' अशा भावना सामान्य नागरिकांमधून व्यक्त होत आहेत. अजित पवार यांच्या आठवणी आणि कार्य राज्याच्या राजकीय इतिहासात कायम स्मरणात राहतील, अशा शब्दांत नागरिकांनी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

# राजकारणातले 'दादा' पर्व संपले



बुधवार २८ जानेवारीची सकाळ महाराष्ट्रासाठी सकाळ न ठरता काळ रात्र ठरली कारण या सकाळी महाराष्ट्राच्या राजकारणातील धडाडीचा लोकनेता उपमुख्यमंत्री अजित पवार काळाच्या पडद्याआड गेले. बुधवारी सकाळी ९ वाजता टीव्हीवर बातम्या पाहत असताना उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमानाला अपघात ही ब्रेकिंग न्यूज ऐकली आणि काळजाचा ठोका चुकला. अजित पवार हे या अपघातातून सहिसलामत वाचावेत अशी प्रार्थना करत असतानाच अजित पवारांच्या निधनाची बातमी टीव्हीवर झळकली आणि मन सुन्न झाले. या बातमीने संपूर्ण महाराष्ट्रावर शोककळा पसरली ही बातमी खोटी निघावी अशी अनेकजण प्रार्थना करत होते पण नियतीच्या मनात काही वेगळेच होते. दादा आपल्यात नव्हते. क्षणात होत्याचे नव्हते झाले. त्यांच्या निधनाने संपूर्ण महाराष्ट्र सुन्न झाला. कार्यकर्ते, नेते, तरुण, वृद्ध, महिला सगळ्यांच्याच अश्रुंचा बांध फुटला. दादा म्हणजे महाराष्ट्राच्या राजकारणातील एक वादळ होते. चार दशकांहून अधिक काळ आपल्या कर्तृत्वाने महाराष्ट्राच्या राजकारणावर ठसा उमटवणारा हा वाघ नागरिकांना कायमचा सोडून जरी गेला असला तरी आपल्या कार्याने त्यांनी नागरिकांच्या मनावर जो ठसा उमटवला तो कधीही निघून जाणार नाही. दादा म्हणजे कामाचा माणूस. दादाकडे गेले की काम होणारच असा विश्वास लोकांना असायचा. काम होण्यायोग्य असेल तर लगेच करणारा आणि होण्यायोग्य नसेल तर तोंडावर नाही म्हणणारा. पोटात एक आणि ओठात एक असे राजकारणी दादा नव्हते जे पोटात आहे तेच बोलणारा आणि तेच करणारा. कडक शिस्तीचा पण तितकाच दिलदार मनाचा. मिश्किल, सुस्वभावी मनात येईल ते पटकन बोलून टाकणारा. बोलताना कशाचीही तमा न बाळगणारा पण आपण बोलल्याने कोणाचे मन दुखावले गेले हे लक्षात येताच जाहीर दिलगिरी व्यक्त करणारा आणि त्यासाठी जाहीर प्रायश्चित घेणारा, स्वतः वेळेचे बंधन पाळणारा आणि इतरांना वेळेचे महत्व पटवून देणारा. तरुणांना निर्व्यवसनी राहण्याचा सल्ला देणारा, चुकीला चूक आणि बरोबर असेल तर बरोबर म्हणणारा, कार्यकर्ता असो की नेता, स्वपक्षातील असो की विरोधातील चुकीचे वागत असेल तर त्याला वडिलकीच्या नात्याने खडसावणारा आणि त्याच नात्याने त्याच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहणारा, सतत सत्तेत राहूनही विरोधी पक्षांशी मैत्रीचे संबंध जपणारा, सकाळी सहा वाजता कामाला सुरुवात करणारा आणि ते काम दर्जेदार व्हावे असा हट्ट धरणारा, केवळ आणि केवळ महाराष्ट्राचा विकास हेच डोक्यात असणारा आणि त्यासाठी दिवसाचा रात्र करणारा, भाजप, शिवसेनेसारख्या हिंदुत्ववादी पक्षाशी हातमिळवणी करून सत्ता स्थापन करणारा तरीही शिव, शाहू, फुले आंबेडकरांचा पुरोगामी विचार न सोडणारा, त्या विचारांशीच एकनिष्ठ राहणारा, कुटुंब आणि राजकारण यांची योग्य सांगड घालणारा, कुटुंबात राजकारण आणि राजकारणात कुटुंब येऊ न देणारा दादा म्हणजे राजकारणातील वेगळेच रसायन होते. प्रत्येक गाव खेड्यातील कार्यकर्त्याला दादा म्हणजे आपला नेता वाटत होता. जवळपास चार दशकांहून अधिक काळ महाराष्ट्राच्या राजकारणाच्या केंद्रस्थानी राहिलेल्या दादांच्या राजकीय जीवनाची सुरुवात १९८१- ८२ साली छत्रपती सहकारी साखर कारखान्याचे संचालक म्हणून झाली. भारतीय राजकारणातले द्रष्टे नेते काका शरद पवार यांनी त्यांच्यातील नेतृत्व गुण हेरून त्यांना राजकारणात आणले. १९९१ साली आपल्या नेतृत्व गुणाची चुणूक दाखवून दादांनी पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत सत्तांतर घडवून आणले. त्याच वर्षी सोमेश्वर सहकारी साखर कारखान्यावर देखील आपले वर्चस्व मिळवले. दादांच्या नेतृत्व गुणाची पारख झाल्याने १९९१ साली शरद पवारांनी दादांना थेट खासदारकीची संधी दिली. खासदार म्हणून मोठ्या मताधिक्याने जिंकून आलेल्या दादांनी काकांसाठीच खासदारकीचा राजीनामा देऊन बारामतीत आमदारकी लढवली तेव्हापासून कामाच्या आणि लोकसंपर्का च्या जोरावर दादा बारामती तालुक्यातून सलग आठ वेळा विक्रमी मतांनी आमदार म्हणून निवडून आले. १९९१ साली पहिल्यांदाच आमदार झालेल्या दादांना सुधाकरराव नाईक यांनी आपल्या मंत्रिमंडळात घेतले आणि कृषी, फलोत्पादन आणि ऊर्जा खात्याचे राज्यमंत्रीपद दिले. १९९९ नंतर त्यांनी ग्रामविकास, पाणीपुरवठा, स्वच्छता ही मंत्रिपदे सांभाळी. जलसंपदा हे खातेही २०१० पर्यंत त्यांच्याकडेच होते. अर्थमंत्री म्हणून तर त्यांनी विक्रम केला. महाराष्ट्राचे अर्थमंत्रिपद त्यांनी सर्वाधिक काळ भूषवले. दादांनी सहा वेळा महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री म्हणून शपथ घेण्याचा विक्रम केला. सहा वेळा उपमुख्यमंत्रीपद भूषवणारे दादा हे एकमेव राजकीय नेते असतील. दरम्यानच्या काळात त्यांच्या गळ्यात विरोधी पक्षनेत्याची माळही पडली. १९९९ साली शरद पवारांनी राष्ट्रवादी काँग्रेसची स्थापना केल्यावर राष्ट्रवादी पक्ष आणि घड्याळ चिन्ह घरोघरी पोहचवण्यासाठी त्यांनी जीवाचे रान केले. शरद पवार दिल्लीचे राजकारण करत असल्याने महाराष्ट्रातील राष्ट्रवादीची धुरा त्यांच्याच खांद्यावर होती. त्यांच्यामुळेच राष्ट्रवादी काँग्रेस कायम सत्तेत राहता आले. दादांची जशी राजकारणार पकड होती तशीच पकड त्यांची कला, क्रीडा, साहित्य, सहकार, शिक्षण, जलसिंचन या क्षेत्रावर देखील होती. प्रत्येक क्षेत्राचा बारकाईने अभ्यास करून त्यात सर्वोत्तम देणारा अजित पवारांसारखा दुसरा नेता नाही. त्यांचा इतका कामाचा झपाटा असणारा नेता पुन्हा होणार नाही. अजित पवार यांच्या निधनाने महाराष्ट्राची कधीही न भरून निघणारी हानी झाली आहे. त्यांचा सारखा नेता पुन्हा होणार नाही. त्यांच्या निधनाने राजकारणातील ' दादा' पर्व संपले असे म्हंटले तर वावगे ठरणार नाही. धडाडीचे लोकनेते असणारे सर्वांचे लाडके अजितदादा पवार यांना भावपूर्ण श्रद्धांजली !



**श्याम ठाणेदार**
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

## वात्रटिका

### तोंडाला भरती येते

कोणी बोलले नाही,तर
कोणी भलतच बोलले...
दोन्ही ठिकाणी बघा कसे
अकलेचे धिंडवडे निघाले...
विसर पडला कोणाला
तर कोणाला भरती आली...
दोन्ही ठिकाणी थोरांच्या
विचाराला तिलांजली दिली...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
**8698067566**

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# अजित पवार यांच्या निधनाने माढा तालुक्यात शोककळा



**माढा (प्रतिनिधी):–** राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनाच्या वृत्ताने माढा तालुक्यात तीव्र शोककळा पसरली आहे. या दुःखद घटनेच्या पार्श्वभूमीवर माढा शहरातील बाजारपेठ पूर्णपणे बंद ठेवण्यात आली होती. नागरिकांमध्ये शोकभावना दिसून येत होती. माढा शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात सर्वपक्षीय वतीने श्रद्धांजली सभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विविध पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

श्रद्धांजली कार्यक्रमास माजी आमदार धनाजीराव साठे, प्रा. शिवाजीराव सावंत, नगराध्यक्ष मीनलताई साठे, उपनगराध्यक्ष कल्पना जगदाळे, दादासाहेब साठे, माजी जिल्हा परिषद सदस्य आनंदराव कानडे, माजी पंचायत समिती सदस्य पृथ्वीराज सावंत, ऋतुराज सावंत, संभाजी ब्रिगेडचे दिनेश जगदाळे, नगरसेवक अजिनाथ माळी, नाना साठे, माजी नगराध्यक्ष गंगाराम पवार, राहुल लंकेश्वर, शिवसेनेचे भैया खरात, वंचित बहुजन आघाडीचे रवी सरवदे, शिवसेना (उबाठा)चे संतोष जुगदार, दादा भांगे, मुन्ना साठे, शहाजी चवरे, महेश चवरे, नगरसेवक राजू गोटे, आदित्य भांगे, समर्थ भांगे, रणदिवेवाडीचे माजी सरपंच दिगंबर इंगळे, बाबा मस्के, शंभूराजे साठे आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी श्रद्धांजली अर्पण करताना माजी आमदार धनाजीराव साठे आणि नगराध्यक्ष मीनलताई साठे यांचा कंठ दाटून आला होता.

दरम्यान, प्रा. शिवाजीराव सावंत यांनी आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले की, भैरवनाथ शुगर सोनारी या कारखान्याच्या उभारणीत अजित पवार यांचे मोलाचे सहकार्य लाभले होते. २००९ च्या विधानसभा निवडणुकीदरम्यान त्यांच्याशी सविस्तर चर्चा झाली होती. पक्षभेद विसरून अजित पवार नेहमी आपुलकीने वागले. त्यांच्या निधनाने घरातील व्यक्ती गेल्याचे दुःख होत असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

अजित पवार यांच्या निधनाने माढा तालुक्यातील राजकीय, सामाजिक क्षेत्रात हळहळ व्यक्त करण्यात येत असून सर्व स्तरातून श्रद्धांजली वाहिली जात आहे.

# सोलापूरच्या विकासात अजित पवारांचा मोलाचा वाटा

## ५० कोटींचा निधी मंजूर



विमानतळाच्या विकासाची मागणी सोलापूरकरांकडून सातत्याने होत होती. यासाठी विविध आंदोलनही झाली होती.

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** सोलापूरच्या औद्योगिक, कृषी, सहकार, आरोग्य व शैक्षणिक विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या बोरामणी आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या विकासासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मंजूर केलेल्या ५० कोटी रुपयांच्या निधीमुळेच ३२ हेक्टर जमिनीचे भूसंपादन करणे शक्य झाले होते.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अकाली निधनानंतर सोलापूरच्या विकासासाठी त्यांनी दिलेल्या योगदानाची आठवण शहरवासियांना झाली आहे. होटगी विमानतळावरून विमानसेवा सुरू करण्यास मर्यादा असल्याने बोरामणी

राज्यात महाविकास आघाडीची सत्ता असताना माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांनी बोरामणी विमानतळासाठी भरीव निधी मिळावा, यासाठी सातत्याने पाठपुरावा केला होता. त्याचबरोबर तत्कालीन आमदार प्रणिती शिंदे यांनी भूसंपादनासाठी ५० कोटी रुपयांची मागणी तत्कालीन अर्थमंत्री अजित पवार यांच्याकडे केली होती. या मागणीला प्रतिसाद देत अजित पवार यांनी काही मिनिटांतच ५० कोटी रुपयांचा निधी मंजूर केला होता.

या निधीतून शेतकऱ्यांकडील ३२ हेक्टर जमिनीचे भूसंपादन पूर्ण करण्यात आले. निधी मंजूर झाल्यानंतर अजित पवार यांनी विमानतळ विकासाच्या कामाबाबत महाराष्ट्र विमानतळ विकास प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांकडून सातत्याने आढावा घेतला. रात्रंदिवस अधिकाऱ्यांशी संपर्क साधून कामाचा तपशील मागवला जात होता.

दरम्यान, वन विभागाच्या अखत्यारीतील जमिनीच्या भूसंपादनामुळे विमानतळ विकासाचे काम रखडले. ही जमीन महाराष्ट्र विमानतळ विकास प्राधिकरणाच्या ताब्यात मिळावी, यासाठी अजित पवार यांचा केंद्र सरकारकडे पाठपुरावा सुरू होता. मात्र, त्यांच्या अकाली जाण्याने हा पाठपुरावा आता कमी पडेल, अशी भावना सोलापूरकरांमधून व्यक्त होत आहे.

# सोलापूरच्या इंद्रभुवनशी जोडलेली अजित पवारांची आठवण



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** सोलापूर महानगरपालिकेच्या आवारातील ऐतिहासिक इंद्रभुवन इमारतीशी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या आठवणी आजही जिवंत आहेत. विकासकामांचा बारकाईने आढावा घेताना त्यांनी दाखवलेली दृष्टी, ऐतिहासिक वारशाविषयीची आपुलकी आणि स्पष्ट सूचना आजही महापालिका प्रशासनात स्मरणात आहेत.

शनिवार, दि.३ फेब्रुवारी २०२४ रोजी दुपारी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सोलापूर महापालिकेला भेट दिली होती. यावेळी तत्कालीन महापालिका आयुक्त शीतल तेली–उगले यांनी त्यांचे स्वागत केले. इंद्रभुवन इमारतीतील मीटिंग हॉलमध्ये झालेल्या बैठकीत अजित पवार यांनी शहरातील विविध विकासकामांचा सविस्तर आढावा घेतला. स्क्रीनवर सुरू असलेली सादरीकरणे त्यांनी लक्षपूर्वक पाहिली. प्रत्येक मुद्द्यावर प्रश्न विचारत, आवश्यक त्या सूचना त्यांनी अधिकाऱ्यांना दिल्या.

यानंतर अजित पवार यांनी सोलापूरच्या ऐतिहासिक वारशाचे प्रतीक असलेल्या इंद्रभुवन इमारतीची प्रत्यक्ष पाहणी केली. स्मार्ट सिटी योजनेअंतर्गत करण्यात आलेल्या नूतनीकरणाकडे त्यांनी विशेष लक्ष दिले. मूळ वास्तुशैलीला कोणताही धक्का बसू नये, याबाबत त्यांनी ठाम भूमिका मांडली. काही ठिकाणी आढळलेल्या लहानसहान त्रुटी तात्काळ दुरुस्त करण्याच्या स्पष्ट सूचना त्यांनी महापालिका प्रशासनाला दिल्या.

इंद्रभुवनच्या ऐतिहासिक महत्त्वाबाबत बोलताना अजित पवार म्हणाले होते, 'इंद्रभुवन ही केवळ इमारत नसून सोलापूरचा इतिहास आहे.' नूतनीकरणाचे काम उत्कृष्ट दर्जाचे झाल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त करत महापालिकेच्या कार्याचे कौतुक केले होते.

बृहन्मुंबई महानगरपालिकेनंतर ऐतिहासिक वारसा लाभलेली सोलापूर महापालिका ही राज्यातील एकमेव महानगरपालिका असल्याचेही त्यांनी नमूद केले होते.

आजही इंद्रभुवनच्या दगडी भिंती, कमानी आणि ऐतिहासिक रचनेतून 'मूळ सौंदर्य जपा' असा अजित पवार यांचा संदेश आठवणींच्या रूपाने उमटताना दिसतो. त्यांच्या त्या भेटीने इंद्रभुवनच्या इतिहासात एक महत्त्वाचा क्षण नोंदवला गेला असून, तो सोलापूरकरांच्या स्मरणात कायम राहणार आहे.

# माढा-करमाळा: अजित पवार यांच्या निधनाने जनतेत हळहळ



**माढा (कटूसत्य वृत्त):–** महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री तथा माढा–करमाळा तालुक्यांचे लाडके नेते अजित पवार यांचे विमान अपघातात दुर्दैवी निधन झाल्याची बातमी कळताच माढा आणि करमाळा तालुक्यांतील जनतेला मोठा धक्का बसला. 'अजितदादा आता आपल्यात नाहीत' हे शब्द कानावर पडताच अनेक क्षणभर सुन्न झाले. विकासाचा चेहरा म्हणून ओळख असलेल्या अजितदादांच्या जाण्याने दोन्ही तालुके शोकमग्न झाले आहेत.

विमान अपघातातील निधनाची बातमी समजताच सुरुवातीला कुणाचाच विश्वास बसत नव्हता. मात्र, ही बातमी खरी ठरताच माढा व करमाळा तालुक्यांच्या विकासासाठी अजितदादांनी घेतलेले निर्णय, उचललेली पावले आणि दिलेली आश्वासने नागरिकांच्या डोळ्यांसमोर उभी राहिली. कुडुर्वाडी नगरपालिकेच्या पाणीपुरवठा योजनेसाठी त्यांनी बारामतीचा निधी उपलब्ध करून दिल्याची आठवण अनेकांनी यानिमित्ताने व्यक्त केली.

माढा आणि करमाळा तालुक्याचे नेतृत्व करणारे माजी आमदार बबनराव शिंदे व संजय शिंदे यांचे अजितदादांशी अत्यंत जिव्हाळ्याचे संबंध होते. या दोघांनी तालुक्याच्या विकाससंदभार्तील प्रश्न अजितदादांसमोर मांडले की, त्यांनी केवळ आश्वासन न देता प्रत्यक्ष कृतीतून ते प्रश्न मार्गी लावले.

सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक ही शेतकऱ्यांची आर्थिक जीवनवाहिनी मानली जाते. बँकेची आर्थिक स्थिती ढासळल्यानंतर तिची सूत्रे प्रशासकांच्या ताब्यात गेली होती. परिस्थिती सावरत असतानाच निवडणुकीचा प्रश्न न्यायालयात गेला.

ही बाब माजी आमदार संजय शिंदे यांनी अजितदादांच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर त्यांनी थेट शरद पवार यांच्याशी चर्चा केली. न्यायालयात गेलेल्यांना फोन करून प्रकरण मागे घेण्यास सांगण्यात आले आणि बँकेला पुन्हा उभे राहण्याची संधी मिळाली.

हा निर्णय आजही शेतकरी वर्ग कृतज्ञतेने आठवतो.

गेल्या कार्यकाळात एकट्या करमाळा तालुक्यासाठी सुमारे ३४०० कोटी रुपयांचा विकासनिधी उपलब्ध करून देण्यात अजित पवार यांची निर्णायक भूमिका होती. कुडुर्वाडी शहराच्या पाणीपुरवठा योजनेसाठी साडेतीनशे कोटी रुपयांचा निधी आवश्यक असताना आर्थिक मर्यादा निर्माण झाल्या होत्या. त्या कठीण प्रसंगी अजितदादांनी बारामतीसाठीचा निधी थांबवून तो थेट कुडुर्वाडी नगरपालिकेच्या पाणीपुरवठा योजनेसाठी मंजूर करून दिला. हा निर्णय त्यांच्या विकासात्मक प्राधान्यक्रमाचे ठळक उदाहरण ठरला.

माढा व करमाळा तालुक्यांतील वीज समस्या असो वा पायाभूत सुविधांचे प्रश्न, प्रत्येक बाबतीत त्यांनी शिंदे बंधूंच्या आग्रहाला मान देत सहकार्याची भूमिका घेतली. त्यामुळे या भागातील जनतेने त्यांना केवळ उपमुख्यमंत्री म्हणून नव्हे, तर आपला हक्काचा माणूस म्हणून पाहिले. त्यांच्या निधनाने हा आपला माणूस गमावल्याची भावना आज दोन्ही तालुक्यांतून व्यक्त होत आहे.

(सरकार मान्य)
अथर्व पेस्ट कंट्रोल
An ISO 9001-15 सर्टीफाईड कंपनी
प्रोप्रा. हरी सुभाष विरपे
9822964815
9421984815
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

# 'कामाचा माणूस गेला'– करमाळ्यात आठवतोय अजित पवारांचा दौरा



**करमाळा (कटूसत्य वृत्त):–** गेल्या वर्षी सप्टेंबर–ऑक्टोबर महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे करमाळा तालुक्यात मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. या नुकसानीची पाहणी करण्यासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी करमाळा तालुक्याचा दौरा केला होता. कोटी व संगोबा या गावांमध्ये पुराचे पाणी व चिखलातून वाट काढत त्यांनी प्रत्यक्ष शेतीत जाऊन परिस्थितीची पाहणी केली होती. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांशी संवाद साधत त्यांनी त्यांना धीर दिला होता व मदतीचे आश्वासन दिले होते.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनानंतर त्यांचा हा करमाळा दौरा पुन्हा एकदा नागरिकांच्या आठवणीत आला असून, 'कामाचा माणूस गेला' अशा भावना व्यक्त केल्या जात आहेत. बारामती येथे विमान अपघातात पवार यांचे दुर्दैवी निधन झाले. या अनपेक्षित घटनेने करमाळा तालुक्यासह संपूर्ण परिसरात शोककळा पसरली आहे.

अजित पवार आणि करमाळा तालुक्याचे नेहमीच जिव्हाळ्याचे संबंध राहिले आहेत. तालुक्यातील विविध राजकीय गटनेत्यांचा त्यांच्याशी थेट संपर्क होता. त्यांच्या निधनानंतर २४ सप्टेंबर २०२५ रोजी झालेला करमाळा दौरा विशेष चर्चेत आला आहे.

त्या दौऱ्यात पवार यांनी कोटी गावात पुराच्या पाण्यामुळे झालेल्या नुकसानीची माहिती घेतली होती. त्यानंतर संगोबा येथे सीना नदीला आलेल्या पुराची पाहणी करत, साचलेल्या पाण्यातून चालत जाऊन शेतीची परिस्थिती त्यांनी प्रत्यक्ष पाहिली होती. संगोबा येथील सीना नदीवरील पूल पाण्याखाली गेल्याने गावाचा महत्त्वाच्या भागांशी संपर्क तुटतो, अशी माहिती त्यांना देण्यात आली होती. वरील भागातून १७ हजार क्युसेक पाणी सोडण्यात आल्याने पूल पाण्याखाली गेला होता.

यावेळी अजित पवार यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना स्पष्ट सूचना दिल्या होत्या. भविष्यात २० ते २५ हजार क्युसेक पाणी सोडले तरी ते पुलाखालून सुरक्षितपणे जावे, अशा प्रकारे पूल उभारण्याचे निर्देश त्यांनी दिले. या पुलाच्या कामासाठी आवश्यक निधी कोणत्या योजनेतून द्यायचा, ते आपण ठरवू, असे सांगत भूम, परांडा व करमाळा तालुक्यातील नागरिकांच्या मागणीची दखल घेतली होती. उद्या ढगफुटी झाली तरी नागरिकांना त्रास होऊ नये, असे त्यांनी स्पष्ट केले होते.

या दौऱ्यात पवार यांनी शेतकऱ्यांशी थेट संवाद साधत शासन त्यांच्या पाठीशी असल्याचा विश्वास दिला होता. नागरिकांनी पुलाची मागणी मांडताच त्यांनी तात्काळ सकारात्मक भूमिका घेतली होती. त्यांच्या निधनानंतर त्या आठवणी पुन्हा ताज्या झाल्या असून करमाळा तालुक्यात हळहळ व्यक्त केली जात आहे.

## जाहीर प्रसिध्दीकरण अर्ज नं /२०२६

**मोहोळ येथील मे. तहसिलदार साहेब यांचे समोर**

जमीला मोहंम्मद हनीफ शेख
वय – ५९ वर्षे. धंदा– मजुरी
रा. ठाणे जि.ठाणे
}अर्जदार

**विरूद्ध**

मोहोळ नगरपरिषद मोहोळ }सामनेवाला

ज्याअर्थी वर नमुद अर्जदार जमीला मोहंम्मद हनीफ शेख यांचा जन्म दि. १०/४/१९६७ रोजी मोहोळ ता.मोहोळ.जि.सोलापूर येथे झाला आहे. अर्जदार याने सदर सामनेवाला यांच्याकडे अर्जदार जमीला मोहंम्मद हनीफ शेख यांच्या जन्माबाबत सामनेवाला यांच्याकडे जन्म दाखल्याची तारीख वरील नमुद तारखे नुसार केली असता त्यावेळी सामनेवाला यांनी त्यांच्याकडील माहे एप्रिल १९६७ चे आभिलेखात अर्जदार यांची जन्मनोंद नसल्याबाबतचा दाखला दिला व त्याबदल सदर अर्जदारने या मे. कोर्टात सामनेवाला यांच्याकडील आभिलेखात जन्माची नोंद घेणे कामी आदेश होणेसाठी अर्ज केला आहे. याबाबत कोणाचा आक्षेप/हरकत असल्यास दि.१४/२/२०२६ रोजी किंवा हि नोटीस प्रसिद्ध केल्यापासून १५ दिवसाच्या आत स्वत अथवा वकिलामार्फत मे. कोर्टात हजर राहून आपले म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाची कसलीही हरकत नाही आल्यास अर्जातील मागणी प्रमाणे जन्म दाखला देणेबाबत सामनेवाला यांना आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी. हे प्रसिद्धकरण आमच्या सहीशिक्या निशी दिले असे.ता.३०/१/२०२६

लिपीक (शिक्का) हुकूमावरुन
तहसीलदार मोहोळ सोलापूर

## जाहीर प्रसिध्दीकरण अर्ज नं /२०२६

**मोहोळ येथील मे.तहसिलदार साहेब यांचे समोर**

नफिसा बाबू शेख
वय –४८ वर्षे. धंदा– गृहिणी
रा. माळशिरस जि.सोलापूर
}अर्जदार

**विरूद्ध**

मोहोळ नगरपरिषद मोहोळ }सामनेवाला

ज्याआर्थी वर नमुद अर्जदार नफिसा बाबू शेख यांचा जन्म दि.४/१०/१९७९ रोजी मोहोळ ता.मोहोळ.जि.सोलापूर येथे झाला आहे.अर्जदार याने सदर सामनेवाला यांच्याकडे अर्जदार नफिसा बाबू शेख यांच्या जन्माबाबत सामनेवाला यांच्याकडे जन्म दाखल्याची तारीख वरील नमुद तारखे नुसार केली असता त्यावेळी सामनेवाला यांनी त्यांच्याकडील माहे ऑक्टोबर १९७९ चे आभिलेखात अर्जदार यांची जन्मनोंद नसल्याबाबतचा दाखला दिला व त्याबदल सदर अर्जदारने या मे कोर्टात सामनेवाला यांच्याकडील आभिलेखात जन्माची नोंद घेणे कामी आदेश होणेसाठी अर्ज केला आहे. याबाबत कोणाचा आक्षेप/हरकत असल्यास दि.१४/२/२०२६ रोजी किंवा हि नोटीस प्रसिद्ध केल्यापासून १५ दिवसाच्या आत स्वत अथवा वकिलामार्फत मे कोर्टात हजर राहून आपले म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाची कसलीही हरकत नाही आल्यास अर्जातील मागणी प्रमाणे जन्म दाखला देणेबाबत सामनेवाला यांना आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी. हे प्रसिद्धकरण आमच्या सहीशिक्या निशी दिले असे.
ता.३०/१/२०२६

लिपीक (शिक्का) हुकूमावरुन
तहसीलदार मोहोळ सोलापूर

## जाहीर प्रसिध्दीकरण अर्ज नं /२०२६

**मोहोळ येथील मे.तहसिलदार साहेब यांचे समोर**

जमील रहेमतुल्ला शेख
वय –५९ वर्षे. धंदा– मजुरी
रा. श्रीगोंदा जि. अहमदनगर
}अर्जदार

**विरूद्ध**

मोहोळ नगरपरिषद मोहोळ }सामनेवाला

ज्याआर्थी वर नमुद अर्जदार जमील रहेमतुल्ला शेख यांचा जन्म दि. १/६/१९६९ रोजी मोहोळ ता.मोहोळ.जि.सोलापूर येथे झाला आहे. अर्जदार याने सदर सामनेवाला यांच्याकडे अर्जदार जमील रहेमतुल्ला शेख यांच्या जन्माबाबत सामनेवाला यांच्याकडे जन्म दाखल्याची तारीख वरील नमुद तारखे नुसार केली असता त्यावेळी सामनेवाला यांनी त्यांच्याकडील माहे जून १९६९ चे आभिलेखात अर्जदार यांची जन्मनोंद नसल्याबाबतचा दाखला दिला व त्याबदल सदर अर्जदारने या मे कोर्टात सामनेवाला यांच्याकडील आभिलेखात जन्माची नोंद घेणे कामी आदेश होणेसाठी अर्ज केला आहे. याबाबत कोणाचा आक्षेप/हरकत असल्यास दि.१४/२/२०२६ रोजी किंवा हि नोटीस प्रसिद्ध केल्यापासून १५ दिवसाच्या आत स्वत अथवा वकिलामार्फत मे कोर्टात हजर राहून आपले म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाची कसलीही हरकत नाही आल्यास अर्जातील मागणी प्रमाणे जन्म दाखला देणेबाबत सामनेवाला यांना आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी. हे प्रसिद्धकरण आमच्या सहीशिक्या निशी दिले असे.
ता.३०/१/२०२६

लिपीक (शिक्का) हुकूमावरुन
तहसीलदार मोहोळ सोलापूर

निर्मल व्यसनमुक्ती केंद्र
**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नंपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अँडमीट करण्याची सोय
**निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**
–: संपर्क :–
8083608083
9922646566
8698732109

# डॉ.कश्मिरा यांच्या आरोग्य शिबिरास महिलांचा उत्तम प्रतिसाद



**अकलूज (कटूसत्य वृत्त):–** अकलूज येथील डॉ. कश्मिरा यांच्या क्लिनिकच्या वतीने महिलांसाठी डेंटल, स्किन व हेअर तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.या शिबीराला महिलांसह युवक व युवती यांनी ही उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून महिलांच्या विविध समस्यांवर निरसन करण्यात आले. या शिबिरात १०० जणांची मोफत तपासणी करण्यात आली.

भारताच्या ७७ व्या प्रजासत्ताक दिनाचे औचित्यसाधून डॉ.कश्मिरा लोहकरे (रत्नपारखी) यांनी सर्वांसाठी मोफत डेंटल, स्किन व हेअर तपासणीचे शिबीराचे आयोजन करण्यात आले होते.या शिबिरात डॉ.कश्मिरा यांनी केसाची निगा, त्वचेची व दातांची काळजी कशी घ्यावयाची व त्यावरील उपचार यावर सर्वांना मार्गदर्शन केले.

यावेळी डॉ कश्मिरा यांनी सांगितले की, दंतोपचाराविषयी रुग्णांना मनात भीती व बरेच गैरसमज असतात त्याविषयी त्यांनी योग्य ते मार्गदर्शन केले तसेच केस व त्वचेची काळजी कशा प्रकारे घ्यावी या बाबत सल्ला दिला.

लग्न समारंभापूर्वी वधू व वर यांनी त्वचेची निगा कशी घ्यावी. त्याविषयी सल्ला दिला.

या शिबिरामध्ये लहान मुलांचे तज्ञ डॉ.अनुजा ढेंबरे-पाटील यांनी लहान मुलांच्या पालकांना अचूक मार्गदर्शन केले.

यावेळी अकलूज नगरपरिषदेच्या नूतन नगरसेवक सौ. प्रतिभा विलासनंद गायकवाड, सौ.अश्विनी लावंड, सौ. रूपाली खरात, सौ. राजश्री काटे, सौ.बालिका धांडोरे, सौ.मयूरी लोंढे,सौ.अंजिता लोंढे, विलासनंद गायकवाड,भारत लावंड आदी उपस्थित होते.

## कटूसत्य शब्दकोडे

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | ■ | ४ | | ५ | | ६ | ■ | ७ |
| ८ | | ■ | ९ | १० | | ■ | | ■ | ११ | १२ | |
| १३ | | ■ | १४ | | ■ | १५ | | | ■ | | ■ |
| ■ | ■ | ■ | | ■ | ■ | १६ | | ■ | १७ | | ■ |
| १८ | | १९ | | | २० | | ■ | २१ | | ■ | ■ |
| | ■ | २२ | | ■ | | ■ | ■ | २३ | | २४ | २५ |
| ■ | २६ | ■ | २७ | | ■ | २८ | | | ■ | २९ | |
| ३० | | | | ■ | ३१ | | ■ | ■ | ३२ | | ■ |
| ३३ | | ■ | | ■ | ३४ | ■ | ३५ | | | ■ | ■ |
| | ■ | ३६ | ■ | ३७ | | ■ | | ■ | ३८ | | ३९ |
| ४० | | | ४१ | | ■ | ४२ | ■ | ४३ | | ■ | |
| ■ | ■ | ४४ | | ■ | ४५ | | | | ■ | ४६ | |

**उभे शब्द :** १) डोळे, नयन
२) काव्य, कविता
३) भाजप पक्षाचे नाव पूर्ण लिहा
४) सीतापती ५) वेळ वाया न घालवता, पटकन ६) न भिणारा ७) श्वास घेण्याचे इंद्रिय १०) नस उलट लिहा
१२) पाय १५) स्वस्तच्या विरूध्दार्थी
१७) समुद्राच्या पाण्याची चव
१८) बसपाचे निवडणूक चिन्ह
१९) वभ उलट लिहा
२०) जंगलातील प्राण्यांचा राजा
२१) स्वभावाने रागीट २४) शपथ (हिंदीत) २५) दमयंती पती २६) आईची बहीण २८) भाकरी थापण्याची मोठी थाळी ३०) भारताच्या उत्तरेकडील उत्तुंग पर्वत
३१) कामातून मिळालेला मोकळा वेळ
३२) अस्वलांचे खेळ दाखविणारा
३५) जुनाच्या विरूध्दार्थी
३६) दहा आणि सात मिळून होणारी संख्या
३७) लोखंडी आकडा, हुक
३९) शहर
४१) मास, महिना
४२) एक हिंदी न्यूज चॅनल-** तक
४३) एक म्हण-** घर पोकळ वासा

**आडवे शब्द :** १) संसदेचे एक सभागृह
४) भारत जोडो यात्रा काढणारे राष्ट्रीय काँग्रेसचे मुख्य नेते
८) स्वाद, रूची ९) पध्दत (हिंदीत)
११) सततची केलेली मागणी, तगादा १३) ख्रिश्चन धर्मसेविका
१४) दोन आणि एक मिळून होणारी संख्या
१५) राशीचक्रातील एक रास १६) फुलांची माळ, पराभव
१७) एक म्हण-** तशी माती
१८) भारतीय निवृत्त फिरकी गोलंदाज
२१) धातूचा बारीक तंतू २२) जंगल, अरण्य
२३) लगेच, तातडीने २७) दह्यात पाणी मिसळून घुसळलेले पेय
२८) सूर्योदयापूर्वीचा उषःकाल २९) मनाला टोचणी लावणारे शल्य
३०) डासांमुळे थंडी वाजून येणारा ताप ३१) रास उलट लिहा
३२) संयम, धमकी देणे, धाप लागणे ३३) मक्षिका ३४) वतनाचा मालक
३७) दुर्ग, किल्ला ३८) बैलाच्या नाकात घातलेली दोरी
४०) महाराष्ट्रातील एक जिल्हा ४३) कपाची जोडीदार ४४) मार्ग, रस्ता (हिंदीत)
४५) राजाचे निवासस्थान ४६) बे दुणे

## सुडोकु – 164

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 8 | 3 | | | | | 1 | | |
| | | | | | 2 | 3 | | |
| 1 | | | | 5 | | | | 4 |
| 9 | 8 | | 1 | | 5 | | 7 | 2 |
| 2 | 5 | 7 | 9 | | | | 3 | 1 |
| 6 | 1 | 3 | 7 | 2 | 8 | | 4 | |
| 4 | 2 | | 5 | | 1 | | | 3 |
| | 7 | 8 | | | 9 | | | 5 |
| | 6 | | 4 | | | | | |

**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

# सोलापूर शहरातील पावसाळी पाणी साचण्याच्या समस्येवर कायमस्वरूपी उपाययोजना

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर शहरामध्ये दरवर्षी पावसाळ्यात सखल भागांमध्ये मोठ्या प्रमाणात पाणी साचण्याच्या घटना घडत असून यामुळे नागरिकांचे आर्थिक नुकसान होत आहे. सन २०१८, २०२० व २०२५ या वर्षांमध्ये शहरातील विविध भागांमध्ये गंभीर जलसंचयाची परिस्थिती निर्माण झाली होती. पावसाळी पाण्याचा योग्य निचरा न होणे, नैसर्गिक जलप्रवाहांमध्ये अडथळे निर्माण होणे तसेच नाल्यांवरील अतिक्रमण ही यामागील प्रमुख कारणे आहेत.

ही परिस्थिती भविष्यात पुन्हा उद्भवू नये, याकरिता सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने मा. आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या अध्यक्षतेखाली पर्जन्यजल नियंत्रण व आपत्ती व्यवस्थापन आराखडा तयार करण्याची व्यापक कार्यवाही हाती घेण्यात आली आहे. यासाठी मा. अतिरिक्त आयुक्त, नगर अभियंता, सार्वजनिक आरोग्य अभियंता, संबंधित नगरसेवक, तक्रारदार नागरिक व महानगरपालिकेचे अधिकारी यांच्यासह संयुक्त बैठका घेण्यात आल्या.

शहरातील ७४ नाल्यांचे सर्व्हेक्षण व ६ बेसिनमध्ये विभागणी सोलापूर शहराच्या १७८ चौरस किलोमीटर क्षेत्राचे गुगल सॅटेलाईट इमेज, टोपोशीट, ड्रोन सर्व्हेक्षण व टोटल स्टेशन सर्व्हेक्षणाच्या आधारे सखल व उंच भागांचा अभ्यास करून शहरातील पावसाळी पाण्याचे ७४ नाले निश्चित करण्यात आले आहेत.

हे नाले एकूण ६ बेसिनमध्ये विभागले असून त्यांची एकूण लांबी सुमारे ११५.७७ कि.मी. इतकी आहे.

**पूर नियंत्रण सर्व्हेक्षण पथकाची स्थापना**

मा. आयुक्त तथा अध्यक्ष, शहर आपत्ती व्यवस्थापन समिती यांच्या आदेशानुसार दि. १९/०१/



२०२५ रोजी पूर नियंत्रण सर्व्हेक्षण पथकाची स्थापना करण्यात आली. या पथकाने प्रत्यक्ष जागेवर जाऊन नाल्यांचे संरेखन, अतिक्रमणे, नैसर्गिक प्रवाहातील बदल, घरांची माहिती, महसूल रेकॉर्ड, बांधकाम परवानग्या आदींचा सखोल अभ्यास करून सविस्तर तांत्रिक अहवाल तयार केला आहे.

**तात्पुरत्या व कायमस्वरूपी उपाययोजना**

आराखड्यामध्ये खालीलप्रमाणे उपाययोजना सुचविण्यात आल्या आहेत –

- नाल्यांची सफाई, गाळ काढणे व प्रवाह मोकळा करणे
- अतिक्रमणे, संरक्षण भिंती, रॅम्प, भराव आदी काढून नैसर्गिक प्रवाह पूर्ववत करणे
- आवश्यक ठिकाणी नाल्यांची रुंदी व खोली वाढविणे
- गजबजलेल्या भागात अपवादात्मक परिस्थितीत भूमिगत नाल्यांची तरतूद
- क्रॉस ड्रेनेज, बॉक्स कल्व्हर्ट, ब्रिज, रोड साईड चर इत्यादींची उभारणी

**विकास आराखड्यात नाल्यांचा समावेश**

नगररचना विभागाच्या माध्यमातून ड्रोन फोटोग्राफी, सॅटेलाईट इमेज व प्रत्यक्ष सर्व्हेक्षणाच्या आधारे नाल्यांचे अंतिम संरेखन निश्चित करून प्रस्तावित विकास आराखड्यात त्यांचा समावेश करण्यात आला आहे. एकूण ७४ नाल्यांपैकी ३० नाल्यांसाठी पहिल्या टप्प्यात प्रत्यक्ष काम सुरू करण्यात आले आहे.

**आपत्ती व्यवस्थापन अधिनियमानुसार मंजुरी**

आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ मधील कलम २६ व कलम ३० अंतर्गत प्राप्त अधिकारास अनुसरून तसेच केंद्रशासनाचे विधी व न्याय मंत्रालय यांचेकडील आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ मधील दि. २९ मार्च २०२५ च्या (Amenfdment) दुरुस्तीमधील कलम ४१अ नुसार शहर प्राधिकरण (Urban Authority) स्थापित करून मा. आयुक्त, सोलापूर महानगरपालिका, सोलापूर यांना शहर आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष म्हणून अधिकार प्राप्त झाले असून, दि. ऑक्टोबर ते डिसेंबर २०२५ दरम्यान झालेल्या आढावा बैठकीत ७४ नाल्यांचा पर्जन्यजल नियंत्रण व आपत्ती व्यवस्थापन आराखडा, तांत्रिक अहवाल तसेच तात्पुरत्या व कायमस्वरूपी उपाययोजनांना सक्षम मंजुरी देण्यात आली आहे.

माहिती वेबसाईटवर उपलब्ध सोलापूर शहर आपत्ती व्यवस्थापन आराखडा, पर्जन्यजल नियंत्रण आराखडा, नालानिहाय सर्व्हेक्षण अहवाल व समिती बैठकींचे इतिवृत्तांत सोलापूर महानगरपालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आले आहेत.https://www.solapurcorporation.gov.in/smc/dmp_plan_details सोलापूर शहरातील पावसाळी पाणी साचण्याच्या समस्येवर शाश्वत व कायमस्वरूपी उपाययोजना राबविण्याच्या दिशेने हे एक महत्त्वपूर्ण पाऊल असल्याचे महानगरपालिकेच्या वतीने स्पष्ट करण्यात आले आहे.

# सुशीलकुमार शिंदे व खा. प्रणिती शिंदे यांनी वाहिली श्रद्धांजली



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्राचे लोकप्रिय नेते व उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांच्या अकाली निधनाने संपूर्ण राज्यावर शोककळा पसरली आहे. समाज व जनतेसाठी सदैव समर्पित असलेल्या अजितदादांच्या जाण्याने महाराष्ट्राच्या राजकारणात कधीही न भरून न येणारी मोठी पोकळी निर्माण झाली आहे.

आज बारामती येथील विद्या प्रतिष्ठान मैदानावर हजारो नागरिकांच्या उपस्थितीत स्व. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पार्थिवावर शासकीय इतमामात व राजकीय सन्मानाने अंत्यसंस्कार करण्यात आले.

यावेळी माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे व खासदार प्रणिती शिंदे यांनी अंतिम दर्शन घेऊन भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली व पवार कुटुंबीयांचे सांत्वन केले. अजितदादा पवार हे दूरदर्शी, कणखर नेतृत्व व प्रशासकीय कामावर मजबूत पकड असलेले जनतेचे नेते होते. कामातील शिस्त, गुणवत्ता आणि विकासाची स्पष्ट दृष्टी ही त्यांची ओळख होती. त्यांच्या समर्पित कार्यामुळे महाराष्ट्राच्या विकासाला नवी दिशा मिळाली.

स्व. अजितदादांच्या आत्म्यास चिरशांती लाभो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना. पवार कुटुंबीयांच्या दु:खात आम्ही सहभागी आहोत. त्यांच्या स्मृती महाराष्ट्राच्या जनतेच्या मनात सदैव अजरामर राहतील.

# कामाचा माणूस गेला; सोलापूरकर भावुक चौकाचौकांत उभारले बॅनर!

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** शहरात अनेक ठिकाणी उपमुख्यमंत्री अजित पवार यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. चौकाचौकांत बॅनर उभारण्यात आले. या दुर्दैवी घटनेमुळे हॉटेल्स, कार्यालये, शाळा व विविध संस्थांमध्ये हळहळ व्यक्त होत होती.

अपघातस्थळी पडलेली कागदपत्रे, सोशल मीडियावरील स्टेट्सवर दादांची छायाचित्रे आणि भावनिक शब्दांतून आदरांजली वाहिली. या घटनेच्या शहरभर शोकभावना उमटताना दिसून आल्या. सोशल मीडियावर अजितदादांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त करणाऱ्या भावनिक पोस्ट्स व स्टेट्स मोठ्या प्रमाणात शेअर होत होत्या. 'कामाचा माणूस', 'धडाडीचा नेता', 'शब्द थांबले, प्रभाव थांबला नाही',



'महाराष्ट्राचे दादा हरपले', 'एकच वादा अजितदादा' अशा शब्दांत नागरिकांनी आदरांजली वाहिली.

नवी पेठ, रंगभवन, शिवसेना कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज चौक आदी ठिकाणी श्रद्धांजली अर्पण करणारे बॅनर लावण्यात आले. ख्रिश्चन समाज, आमदार विजयकुमार देशमुख, माजी नगरसेवक आनंद चंदनशिवे, टिळक चौक मित्र परिवार, नगरसेवक अमोल शिंदे, तौफीक पैलवान ताज ग्रुप यांच्यासह विविध संघटनांनी बॅनरद्वारे आदरांजली व्यक्त केली. या घटनेमुळे शहरभर शोककळा पसरली असून, सर्वसामान्यांपासून विविध क्षेत्रांतील व्यक्तींनी तीव्र दु:ख व्यक्त केले आहे.

**संपूर्ण राज्याचा अभ्यास असणारा नेता**

राजकीय कारकीर्दीत ६ वेळा अजित पवारांनी उपमुख्यमंत्री पदाची जबाबदारी स्वीकारली. मात्र महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्याचा विकास, प्रश्न यांची जाण असणारा व प्रशासनाकडून लोकधोरणे राबवून घेणारा नेता राजकारणात एकमेव होता. या कालावधीत झालेल्या मुख्यमंत्र्यांच्या बरोबरीने त्यांचा अभ्यास होता. त्यामुळे त्यांनी एकदा मुख्यमंत्रिपादीच संधी मिळायला पाहिजे होती. ही खंत नागरिकांनी व्यक्त केली.

# ६८ जागांसाठी २७१ उमेदवार रिंगणात

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्हा परिषदेच्या ६८ गटांसाठी २७१ उमेदवार तर १३६ पंचायत समिती गणांसाठी ४८५ उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. भाजपने महापालिकेनंतर जिल्हा परिषद निवडणुकीत सर्वाधिक उमेदवार रिंगणात उतरविले आहेत.

अन्य पक्षांनी मात्र ताकद जिथे आहे, त्या ठिकाणी उमेदवार दिले आहेत. याशिवाय सांगोला तालुक्यात शेकाप, पंढरपूर व करमाळा तालुक्यात स्थानिक विकास आघाडीचे उमेदवार रिंगणात आहेत.

उत्तर सोलापूर तालुक्यात तीन गटांसाठी १४ तर ६ गणांसाठी २२ उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. बीबीदारफळ गटात सर्वाधिक चार तर कोंडी व नान्नज गटात प्रत्येकी ४ उमेदवार रिंगणात आहेत. मोहोळ तालुक्यातील सहा गटांत २५ उमेदवार तर १२ पंचायत समिती गणांत ४१ उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत.

यामध्ये नरखेड, पेनूर व कुरुल गटात प्रत्येकी ५ तर कामती बु. व आष्टी गटात प्रत्येकी ३ तर पोखरापूर गटात ४ उमेदवार रिंगणात आहेत. आष्टी गणात ४, खंडाळी ३, नरखेड ४, शिरापूर ३, सावळेश्वर ३, कामती बु. ४, सय्यद वरवडे ४, पोखरापूर ४, पेनूर ३, टाकळी सिकंदर




३, कुरुल व घोडेश्वर प्रत्येकी तीन असे एकूण ४१ उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. पंढरपूर तालुक्यातील ८ गटांतून ४७ उमेदवार तर १६ गणांतून ७० उमेदवार निवडणूक लढवीत आहेत. गोपाळपूर ५, वाखरी ८, करकंब ८, भाळवणी २, रोपळे ६, भोसे ३, टाकळी ९, कासेगाव ५ असे एकूण ४७ उमेदवार रिंगणात आहेत.

मंगळवेढा तालुक्यातील चार गटांमध्ये १३ उमेदवार तर ८ गणांत २५ उमेदवार आहेत. हुलजंती गटात २, संत दामाजीनगर गटात ३, लक्ष्मी दहिवडी गटात ५, भोसे गटात ३ उमेदवार रिंगणात आहेत. संत दामाजीनगर गणात २, बोराळे गणात ३, हुलजंती गणात २, मरवडे गणात ३, संत चोखामेळानगर गणात २, लक्ष्मी दहिवडी गणात ७, भोसे गणात ३ तर रड्डे गणात ३ उमेदवार निवडणूक लढवीत आहेत.

माळशिरस तालुक्यातील ९ गटांतून ३० उमेदवार तर १८ गणांतून ५४ उमेदवार रिंगणात आहेत. दहिगाव गटात ४, मांडवे ३, फोंडशिरस ३, संग्रामनगर २, माळीनगर ४, बोरगाव ५, वेळापूर २, निमगाव ४, पिलीव ४ असे एकूण ३० जण रिंगणात आहेत. दक्षिण सोलापूर तालुक्यातील बोरामणी गटात ६, कुंभारी ४,वळसंग ५, हत्तूर ४, मंद्रूप ४, भंडारकवठे ५ असे एकूण २८ तर कासेगाव गणात ६, बोरामणी ४, कुंभारी ५, धोत्री ३, वळसंग ४, होटगी ७, हत्तूर ५, औराद ५, मंद्रूप ५, कंदलगाव ३, भंडारकवठे २, निंबर्गी ३ असे एकूण ५२ उमेदवार रिंगणात आहेत.

**मातब्बरांनी घेतली निवडणुकीतून माघार**

जिल्हा परिषद निवडणुकीत मातब्बर उमेदवारांनी माघार घेत, लढतीचे चित्र स्पष्ट झाले आहे. कोर्टी गटातून सविताराजे भोसले, हत्तूर गटातून इंदुमती अलगोंडा-पाटील, मानेगाव गटातून दादासाहेब साठे, फोंडशिरस गटातून वैष्णवीदेवी मोहिते-पाटील, विमल जानकर यांनी अर्ज माघार घेतला आहे. पण वैष्णवीदेवी मोहिते-पाटील यांचा यशवंतनगर गणात अर्ज कायम आहे. मंगळवेढा तालुक्यात सिद्धेश्वर आवताडे यांनी संत दामाजीनगर, भोसे या जिल्हा परिषद गट व लक्ष्मी दहिवडी या गणातून अर्ज माघार घेतला आहे. माजी समाजकल्याण सभापती शीला शिवशरण यांनी लक्ष्मी दहिवडी गटातून उमेदवारी अर्ज माघारी घेतला आहे.

# दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांना मंत्रालयात भावपूर्ण श्रद्धांजली

**मुंबई, (कटूसत्य वृत्त):-** राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनाबद्दल मंत्रालयातील अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या वतीने मंत्रालयाच्या त्रिमूर्ती प्रांगणात आयोजित शोक सभेत त्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आपल्या सेवाकाळात नेहमी प्रामाणिकपणे, निष्ठेने आणि कर्तव्यभावनेने शासकीय कर्तव्य पार पाडले. त्यांच्या निधनाने राज्य शासनाने एक कर्तव्यदक्ष, शिस्तबद्ध आणि वक्तशीर नेतृत्व गमावले आहे, अशी भावना अपर मुख्य सचिव विकास खारगे यांनी उपस्थितांच्या वतीने यावेळी व्यक्त केली. याप्रसंगी मंत्रालयातील वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी डॉ. इकबालसिंह चहल, मनीषा म्हैसकर, अश्विनी भिडे, असिम कुमार गुप्ता, विकासचंद्र रस्तोगी, वेणुगोपाल रेड्डी, अनुपकुमार सिंग, राधिका रस्तोगी, एकनाथ डवले, सौरभ विजय, डॉ. हर्षदीप कांबळे, अतुल पाटणे, संजय खंदारे, एस.चोक्कलिंगम, रणजितसिंह



देओल, वीरेंद्र सिंह, गणेश पाटील, संतोष कुमार, दिलीप घुमरे, जयश्री भोज, अंशु सिन्हा, राजेश गवांदे, विजय वाघमारे, मकरंद देशमुख यांच्यासह उपस्थित अधिकारी, कर्मचारी यांनी दिवंगत अजित पवार यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करुन आदरांजली वाहिली. यावेळी दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या कुटुंबीयांप्रती सहवेदना व्यक्त करण्यात येऊन त्यांना हे दु:ख सहन करण्याचे बळ लाभो, अशी प्रार्थना करण्यात आली.

यावेळी मंत्रालयातील मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या अधिकारी, कर्मचारी यांनी दोन मिनिटे मौन पाळून दिवंगत अजित पवार यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करुन श्रद्धांजली वाहिली.

# दारू माफियांवर उत्पादन शुल्कची धाड

## जिल्हाभरात धडक कारवाई, ८४ जणांवर कारवाई

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- सोलापूर जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक २०२६ च्या पार्श्वभूमीवर राज्य उत्पादन शुल्क विभागाने अवैध मद्य व्यवसाय करणाऱ्यांविरोधात मोठी आणि निर्णायक कारवाई करत संपूर्ण जिल्ह्यात खळबळ उडवून दिली आहे.

दि. १६ जानेवारी ते २८ जानेवारी २०२६ या कालावधीत राबविण्यात आलेल्या संयुक्त धडक कारवाईत तब्बल ८३ गुन्हे दाखल करण्यात आले असून ८४ आरोपींवर कारवाई करण्यात आली आहे. या कारवाईत ५२ लाख १९ हजार १०२ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सागर धोमकर, विभागीय उपायुक्त (पुणे विभाग) यांच्या निर्देशानुसार आणि श्रीमती भाग्यश्री पं. जाधव, अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, सोलापूर यांच्या नेतृत्वाखाली ही मोहीम राबविण्यात आली. प्र. उपअधीक्षक जे. एन. पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.

**या व्यापक कारवाईत**

२४,०७५ लिटर रसायन,१,६२६ बल्क लिटर हातभट्टी दारू,३९३ बल्क लिटर देशी मद्य,१८९ बल्क लिटर बनावट देशी मद्य,३६८ बल्क लिटर विदेशी मद्य,१,१८९ बल्क



लिटर परराज्यातील (गोवा) विदेशी मद्य, १७,००० बनावट बुचे, ८० बल्क लिटर बिअर, ६२५ लिटर ताडी, ३ चारचाकी व ७ दुचाकी वाहने असा एकूण ४९ लाख ६७ हजार १०२ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

सांगोला (निजामपूर) येथे निरीक्षक पंढरपूर विभागाने केलेल्या कारवाईत ३४६ ब.लि. बनावट विदेशी मद्य, बनावट बुचे व लेबले जप्त करत ५.०३ लाखांचा मुद्देमाल हस्तगत; एक आरोपी अटक.

* सोलापूर शहर (जुना विडी घरकुल) परिसरात गोवा बनावटीचे ५६० ब.लि. विदेशी मद्य व दुचाकीसह ९.२० लाखांचा मुद्देमाल जप्त; तीन आरोपी अटक.

* मोहोळ (आष्टी) येथे भरारी पथक क्र. १ ने १८९ ब.लि. बनावट देशी मद्य जप्त; ८४ हजारांचा मुद्देमाल, एक आरोपी अटक.

* खवणी (मोहोळ) येथे संयुक्त कारवाईत २२५ ब.लि. गोवा निर्मित विदेशी मद्य, २.५२ लाखांचा मुद्देमाल जप्त.

या कालावधीत अवैध मद्यविक्री व मद्यपानास परवानगी देणाऱ्या ८ ढाब्यांवर गुन्हे दाखल करून २४ आरोपींवर कारवाई करण्यात आली आहे.

आचारसंहितेच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात विशेष पथके नियुक्त करण्यात आली असून, अवैध मद्य निर्मिती, विक्री व वाहतुकीविरोधात ही मोहीम अधिक तीव्र केली जाणार असल्याचे अधीक्षक श्रीमती भाग्यश्री पं. जाधव यांनी स्पष्ट केले आहे.

**अवैध मद्याबाबत माहिती असल्यास**

टोल फ्री : १८००२३३९९९९

व्हॉटसअॅप : ८४२२००११३३

माहिती देणाऱ्याचे नाव गुप्त ठेवले जाईल, असे आवाहन करण्यात आले आहे.

# महाराष्ट्राने एक निर्भीड, कार्यक्षम आणि प्रशासनावर सखोल पकड असलेला कणखर नेता गमावला- साकोरे-बोर्डीकर

**मुंबई, (कटूसत्य वृत्त):-** राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या अचानक झालेल्या दु:खद निधनाची बातमी मन सुन्न करणारी आहे. त्यांच्या जाण्याने महाराष्ट्राने एक निर्भीड, कार्यक्षम आणि प्रशासनावर सखोल पकड असलेला कणखर नेता गमावला आहे, अशी भावना ऊर्जा, महिला व बालविकास, सार्वजनिक बांधकाम आणि सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी व्यक्त केली.

अजितदादा पवार यांनी सार्वजनिक जीवनात नेहमीच स्पष्ट भूमिका घेतल्या. अर्थ खात्याच्या माध्यमातून राज्याच्या प्रगतीसाठी त्यांनी घेतलेले निर्णय आजही दिशादर्शक ठरतात. प्रशासनातील बारकावे, आकडेवारीवरची त्यांची पकड आणि निर्णयक्षम नेतृत्व यामुळे ते एक वेगळे व्यक्तिमत्त्व म्हणून ओळखले जात होते. राजकीय मतभेद असूनही



विकासाच्या मुद्द्यांवर त्यांनी नेहमीच व्यापक दृष्टिकोन ठेवला, असे राज्यमंत्री साकोरे-बोर्डीकर यांनी शोकसंदेशात म्हटले आहे.

राजकारणाच्या पलीकडे जाऊन वैयक्तिक नातेसंबंध जपणारा, सहकाऱ्यांशी संवाद साधणारा आणि कामात प्रामाणिकपणा जपणारा नेता म्हणून अजितदादांची ओळख होती. त्यांच्या निधनाने राज्याच्या राजकारणात आणि प्रशासनात निर्माण झालेली पोकळी भरून न निघणारी आहे, असेही त्यांनी नमूद केले.

या कठीण प्रसंगी पवार कुटुंबीयांच्या दु:खात आपण सहभागी आहोत. ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो आणि कुटुंबीयांना हे दु:ख सहन करण्याची शक्ती देवो, अशी प्रार्थना करत महाराष्ट्राच्यावतीने अजितदादा पवार यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करीत असल्याचे राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी शोकसंदेशात म्हटले आहे.

# यंदा हनिमूनला दुबई, आर्द्रा मॉल मध्ये फक्त चार हजार रुपयाच्या खरेदीवर दहा कपल्स ना दुबई ट्रिप- शुभम भुतडा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** प्राइड ऑफ सोलापूर असलेले सर्वात मोठे कपड्यांचे नवीन डेस्टिनेशन आर्द्रा मॉल आपल्या आदरणीय ग्राहका करिता घेऊन आलेले आहे, रुपये 4000 च्या खरेदीवर हमखास भेटवस्तू आणि एक लकी ड्रॉ कुपन तेही दहा कपल्स ना दुबईला जाण्याकरिता ची स्कीम सुरू केली असल्याचे आर्द्रा मॉल चे प्रमुख व्यवस्थापक शुभम भुतडा यांनी सांगितले.

सम्राट चौक सोलापूर - पुणे हायवे डी मार्ट समोर असलेले आर्द्रा मॉल दिवाळीमध्ये कार वितरण केल्यानंतर च्या प्रचंड यशानंतर हे दुसरे दुबईला दहा कपल्स ना पाठवण्याची आणि एक कोटीपर्यंतची बक्षीस योजना



त्यांनी आखली आहे. 3000 पेक्षा जास्त ग्राहकासाठी भव्य बक्षीस मिळण्याची सुवर्णसंधी आहे. ही योजना 25 जानेवारी ते 25 एप्रिल पर्यंत चालणार असून कमीत कमी चार हजार रुपये व त्यापुढील खरेदी करणाऱ्या ग्राहकांना एक लकी ड्रॉ कुपन देण्यात येईल.

दिवाळीमध्ये सुरू केलेला लकी ड्रॉ कूपनद्वारे एका कुटुंबाला कार आणि जवळजवळ 3000 कुटुंबांना वेगवेगळी बक्षीस मिळाली. ग्राहकांच्या उस्फूर्त प्रतिसादानंतर हा दुबईचा स्कीम त्यांनी लॉन्च केलेला आहे.


चला तर मग सोलापूर लातूर धाराशिव आणि बीड येथील ग्राहकांनी ज्यांचं नवीन लग्न ठरलेलं आहे त्यांनी बसण्यासाठी आणि ज्यांचं लग्न झालेला आहे त्यांनी लग्नाच्या वाढदिवसाच्या गिफ्ट खरेदी करण्यासाठी आग्रा मॉलला भेट द्यायचा आहे आणि आपली दुबई ट्रिप नक्की करायची आहे असे आवाहन भुतडा परिवाराकडून करण्यात आलेले आहे.

# सिंहगड इन्स्टिट्यूटमध्ये प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सिंहगड पब्लिक स्कूल व ज्युनिअर कॉलेज आणि एन बी नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालय, केगाव येथे भारताचा ७७ वा प्रजासत्ताक दिन देशभक्तीपूर्ण वातावरणात आणि उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमासाठी कॅम्पस डायरेक्टर संजय नवले सर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात ध्वजारोहणाने झाली. त्यानंतर राष्ट्रगीत सादर करण्यात आले. राष्ट्रगीतामुळे संपूर्ण परिसर देशभक्तीच्या भावनेने भारावून गेला. यावेळी प्रमुख पाहुणे संजय नवले यांनी आपल्या मनोगतात भारतीय संविधानाचे महत्त्व, लोकशाही मूल्ये, विद्यार्थ्यांची जबाबदारी तसेच राष्ट्रनिर्मितीत युवकांचा सहभाग यावर सखोल मार्गदर्शन केले.

यानंतर विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या देशभक्तीपर गीतगायन, भाषणे व सांस्कृतिक कार्यक्रमांनी



उपस्थितांची मने जिंकली. विद्यार्थ्यांच्या सादरीकरणातून देशप्रेम, एकता व राष्ट्रीय अभिमानाचा सुंदर प्रत्यय आला. विशेषत: देशभक्तीपर समूहगीत व प्रेरणादायी भाषणांना उपस्थितांनी उत्स्फूर्त दाद दिली.

उत्तर सोलापूर तालुक्यातील विद्यार्थ्यांसाठी देशभक्तीपर गीतांवर आधारित सामूहिक कवायत संचलन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमासाठी उत्तर सोलापूर तालुक्यातील तीन शाळांची निवड करण्यात आली असून, त्यामध्ये सिंहगड पब्लिक स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, केगाव, सोलापूर या शाळेचा समावेश असल्याची माहिती गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती उत्तर सोलापूर यांनी दिली.

या कार्यक्रमांतर्गत सिंहगड पब्लिक स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, केगाव व नरसिंह विद्यालय, पाकणी, सोलापूर येथील विद्यार्थ्यांनी शिक्षक राजू ठाकूर व श्रीधर देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली कवायत संचलन सादर करून उपस्थितांची प्रशंसा मिळवली.

या कार्यक्रमास प्राचार्या शाहीन शेख, उपप्राचार्य प्रकाश नवले, शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सिंहगड इंजिनिअरिंग कॉलेजचे प्राचार्य डॉ. शंकर नवले, डॉ. एस. एच. पवार, डॉ. आर.टी. व्यवहारे, डॉ. डी. आय. नवले यांची प्रमुख उपस्थिती होती.

# ...आणि प्रणवमुळे विषारी नागाला मिळाले नवे जीवन

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** घरात किंवा घराच्या आसपास, सर्प निघाल्याचे समजताच, नागरिक भयभीत होऊन जातात.

मात्र अकलूज येथील ज्येष्ठ पत्रकार संजय लोहकरे, यांच्या घराच्या परस बागेत नाग आसल्याचे निदर्शनास आल्यानंतर, सर्प अभ्यासक प्रा.धनंजय देशमुख यांना फोन करून बोलवले होते पण ते बाहेर गावी असल्याने,खंडाळी (ता.माळशिरस) येथील युवा सर्प मित्र प्रणव इंगवले देशमुख याला फोन करताच, क्षणाचाही विलंब न लावता तो तत्काळ सर्प निघालेल्यास्थळी पोहचून, अत्यंत काळजीपूर्वक, विषारी नागाला पकडून, निसर्गाच्या स्वाधीन केले.

अकलूज परिसरातील घराच्या अंगणात, स्वयंपाक घरात,शेत शिवारात, गोठ्यात किंवा कडे लोटाच्या भागात आढळणारे कोब्रा,मण्यार,अजगर,धामण यासारखे साप प्रा.धनंजय देशमुख



आणि त्यांनी तयार केलेले ९ सर्पमित्र अत्यंत संयमाने व कौशल्याने पकडून त्यांच्या अधिवासात सोडून देतात.साप दिसताच ठार मारण्याची मानसिकता ग्रामीण भागात आजही मोठ्या प्रमाणावर आढळून येते.मात्र या सर्व सर्प मित्रांच्या सातत्यपूर्ण कार्यामुळे ही मानसिकता हळूहळू बदलू लागली आहे.

नागाचा रंग काळा,तपकिरी, ऑलिव्ह हिरवा किंवा पिवळसर असू शकतो फणा काढल्यावर पाठीवर चष्म्या सारखी किंवा 'U' आकाराची खूण दिसते.आकार व आयुष्य: नागाची लांबी साधारणपणे ३ ते १० फुटां पर्यंत असू शकते. स्वभाव: नाग स्वत:हून हल्ला करत नाहीत.भीती वाटल्यास किंवा डिवचल्यास ते फणा काढून उभे राहतात.नागाचे मुख्य अन्न उंदीर, बेडूक आणि इतर लहान कीटक आहेत.प्रजनन: नाग अंडी घालतात.

**प्रा.धनंजय देशमुख.** सर्पमित्र व सर्प अभ्यासक